# प्रकरण तिसरे

## रयत सेवक सहकारी बँकेची निर्मिती आणि विकास

### ३.१ रयत शिक्षण संस्थेची स्थापना आणि विस्तार :

शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे साधन आहे हे ओळखून आम जनतेच्या शिक्षणासाठी कर्मवीर भाऊराव पाटील यानी सन १९१९ मध्ये काले, ता. कराड, जि. सातारा येथे रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. सर्वांना शिक्षणाची समान संधी लाभली पाहिजे या ध्येयाने प्रेरित होऊन जात, गोत, धर्म पंथ इत्यादी सामाजिक भेद नष्ट करून समता, बंधुता व मानवता याकडे स्वावलंबनाने संस्थेची वाटचाल सुरु आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी वसतिगृहाच्या स्थापनेने संस्थेच्या कार्याला सुरुवात केली. संस्थेच्या स्थापनेबरोबरच सन १९१९ मध्ये काले (जि. सातारा) येथे पहिले वसतिगृह स्थापन केले. १९२१ साली नेर्ले (जि. सांगली) या ठिकाणी वसतिगृह सुरु केले. सातारा येथे १९२४ साली वसतिगृह सुरु केले. १९२७ साली महात्मा गांधी यांच्या हस्ते त्याचे श्री छत्रपती शाहू बोर्डींग हाऊस असे नामाभिधान झाले. विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाच्या सोयीसाठी १९३२ साली गांधी-आंबेडकर कराराच्या स्मृत्यर्थ पुणे येथे युनियन बोर्डींग हाऊस ची स्थापना केली. स्वातंत्र्यपूर्व काळातही या सर्व वसतिगृहातून मागासलेल्या समाजातील विद्यार्थ्यांसह अठरापगड जातींच्या विद्यार्थ्यांना एकत्र राहण्याचे, जेवणाचे व काम करण्याचे धडे दिले. आजही संस्थेच्या शैक्षणिक शाखांना जोडलेल्या मुलामुलींच्या ८० वसतिगृहात सर्वभेदरहीत व कांहीमध्ये कमवा आणि शिका या तत्त्वावर आधारीत अशी व्यवस्था आहे.

प्राथमिक शिक्षणाची सोय सार्वत्रिक करण्याची पूर्वतयारी म्हणून १९३५ साली सातारा येथे संस्थेतर्फे अध्यापक विद्यालयाची स्थापना झाली, ही संस्थेची पहिली शैक्षणिक शाखा, संस्थेतर्फे सध्या एकूण ८ अध्यापक

विद्यालये चालविली जात आहेत. पदवीधर माध्यमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी १९५५ साली सातारा येथे अध्यापक महाविद्यालयाची स्थापना केली. १९७० साली श्रीरामपूर, (जिल्हा अहमदनगर) येथे अध्यापक महाविद्यालय सुरु केले. या दोन्ही महाविद्यालयातून हल्ली पदव्युत्तर शिक्षणही दिले जाते.

धोंडेवाडी, ता. कराड, जि. सातारा येथे संस्थेने १९१९ साली एक प्राथमिक शाळा चालविली होती. १९३६ साली राव बहादूर रामचंद्र रावजी काळे यांच्या स्मरणार्थ संस्थेने सातारा येथे प्राथमिक शाळा स्थापन केली. प्रत्येक खेडयात प्राथमिक शिक्षण उपलब्ध व्हावे या उद्देशाने शाळा-विरहित खेडयांत संस्थेने १९३८ पासून व्हॉलंटरी शाळा उघडण्यास सुरुवात केली. प्रामुख्याने सातारा जिल्ह्याच्या पश्चिमेकडील डोंगराळ भागात आणि पूर्वेकडील दुष्काळी भागात शाळा सुरु केल्या. अशा शाळांची संख्या ५७८ पर्यंत वाढली होती. या विराट योजनेने संस्थेच्या पायाभरणीचे काम मजबूत झाले. स्वातंत्र्योत्तर काळात प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी शासनाने स्वीकारल्यामुळे शिक्षकांसह या शाळा लोकल बोर्डाकडे सुपूर्द केल्या. सध्या ही संस्था १७ प्राथमिक शाळा चालविते. यापैकी पाच ठिकाणी इंग्रजी माध्यम आहे.

प्राथमिक शिक्षणाच्या पाठोपाठ संस्थेने माध्यमिक शिक्षणाचे काम हाती घेतले. १९४० साली सातारा येथे महाराजा सयाजीराव विद्यालय या मोफत आणि निवासी माध्यमिक शाळेची स्थापना केली. सर्व विद्यार्थ्यांना वसतिगृहात राहावे लागत असे. सर्वांना शारीरिक श्रमाची कामे करावी लागत. त्यामुळे स्वावलंबन व श्रमाची प्रतिष्ठा वाढण्यास मदत झाली. परंतु बदललेल्या परिस्थितीत ग्रामीण भागातील सर्व विद्यार्थ्यांना

LIBRARY

माध्यमिक शिक्षणासाठी सातारा येथे येणे अशक्य होऊ लागले. यासाठी संस्थेने विद्यार्थ्यांच्या गावीच माध्यमिक शाळा उघडण्याची मोहीम सुरु केली. सध्या महाराष्ट्रातील तेरा कर्नाटकातील एक अशा चौदा जिल्ह्यात मिळून संस्था ३७३ माध्यमिक विद्यालये चालवीत आहे. संस्थेने २३ ठीकाणी भाग शाळा सुरु केल्या आहेत.

स्वातंत्र्यपूर्व काळात संस्थेच्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी पुणे, मुंबई, कोल्हापूर, बडोदा इत्यादी ठिकाणी जावे लागे. त्याकरीता संस्थेने १९४७ साली सातारा येथे "छत्रपती शिवाजी कॉलेज" या मोफत आणि निवासी कॉलेजची स्थापना केली. सर्व विद्यार्थ्यांना वसतिगृहात राहावे लागे आणि शारीरिक श्रमाची कामेही करावी लागत. यथाकाल कॉलेज सर्वांसाठी खुले झाल्यानंतरही विद्यार्थ्यांसाठी "श्रमवा आणि शिका" ही योजना सुरु आहे. आर्टस्, सायन्स व कॉमर्स या शाखांचे शिक्षण देणारी महाविद्यालये, प्रशिक्षण देणारी महाविद्यालये अभियांत्रिकी महाविद्यालय मिळून सध्या संस्थेमार्फत ७७ महाविद्यालये चालविली जातात. १५ महाविद्यालयांमध्ये पदव्युत्तर शिक्षणाचीही सोय आहे.

महाराष्ट्र शासनाने १९७३ पासून १० अधिक २ अधिक ३ आकृतिबंध स्वीकारला त्यानुसार संस्थेच्या १२८ प्राथमिक विद्यालयांमध्ये हल्ली ११ वी आणि १२ वी चे वर्ग सुरु आहेत.

संस्थेने काही विद्यार्थी धंदेशिक्षण शाळेत घातले होते. काही माध्यमिक विद्यालयांतून संस्थेने तांत्रिक शिक्षणाचे विभाग सुरु केले. आज संस्थेच्या २० माध्यमिक विद्यालयात कार्यशाळेसह परिपूर्ण तांत्रिक विभाग सुरु आहेत. या ठिकाणी संस्थेच्या स्वतंत्र तांत्रिक शाळा सुरु आहेत.

ज्युनिअर कॉलेज विभागात तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षणाची सोय करण्यात आलेली आहे. सातारा येथे १९८३ पासून अभियांत्रिकी महाविद्यालय व तंत्रनिकेतन सुरु केले आहे. अभियांत्रिकी महाविद्यालयात पदव्युत्तर अभ्यासक्रमाचीही सोय आहे. शिवाय अल्पमुदतीच्या व्यावसायिक अभ्यासक्रमांचीही तरतूद आहे.

राष्ट्राच्या उभारणीसाठी स्त्रीवर्गाच्या शिक्षणाची अधिक आवश्यकता आहे या जाणीवेतून संस्थेच्या व्हालंटरी शाळांपैकी काही शाळा फक्त मुलींच्यासाठी चालविल्या जात होत्या. आवश्यक अशा स्त्रीशिक्षिका तयार करण्यासाठी संस्थेने १९४२ साली सातारा येथे जिजामाता अध्यापक विद्यालयाची स्थापना केली. तसेच मुलींच्या वसतिगृहाची सोय केली. सातारा येथेच १९६० साली मुलींसाठी एक माध्यमिक विद्यालय, २६ माध्यमिक शाळा आणि चार महिला महाविद्यालये चालविली जात आहेत.

पूर्वप्राथमिक शिक्षणाचे महत्त्व ओळखून सातारा येथे संस्थेने १९५४ पासून एक बालवाडी आणि एक बालवसतिगृह चालविले होते. सध्या मराठी व इंग्रजी माध्यमांच्या मिळून संस्थेमार्फत एकूण ४७ बालवाड्या चालविल्या जात आहेत.

शाखा प्रकारानुसार १९९१-९२ या वर्षी रयत शिक्षण संस्थेत विविध शाखात एकूण १४,७३४ सेवक काम करीत होते. त्याचा तपशील तक्ता ३.१ मध्ये दिला आहे.

तक्ता ३.१

## रयत शिक्षण संस्थेत काम करणाऱ्या सेवकांची संख्या

(१९९१-९२)

| शाखा प्रकार | स्त्रिया | पुरुष | सेवक संख्या |
|---|---|---|---|
| महाविद्यालये | २६५ | २,५०१ | २,७६६ |
| माध्यमिक विद्यालये | १,२९० | १०,०[illegible]७ | ११,३५७ |
| अध्यापक विद्यालये | ७ | ९८ | १०५ |
| प्राथमिक विद्यालेय | १२६ | ५० | १७६ |
| पूर्वप्राथमिक विद्यालये | १०८ | ७ | ११५ |
| वसतिगृहे | ५ | ३९ | ०४४ |
| कार्यालये | ९ | १३८ | १४७ |
| इतर शाखा | ५ | १९ | २४ |
| एकूण सेवक .. .. | १,८१५ | १२,९१९ | १४,७३४ |

संदर्भ - रयत शिक्षण संस्था, वार्षिक अहवाल १९९१-९२, पृ. ७

रयत शिक्षण संस्था अंतर्गत कर्मचाऱ्यांनी पुढील संस्था सहकारी तत्वावर चालविल्या आहेत.

१) रयत सेवक को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, सातारा

२) रयत सेवा को-ऑपरेटिव्ह स्टोअर्स लिमिटेड

३) लक्ष्मीबाई भाऊराव पाटील शिक्षणोत्तेजक पतपेढी लिमिटेड

या संस्था सहकारी कायद्यानुसार नोंदलेल्या असून वार्षिक अहवाल संबंधीत सभासदांकडे दरवर्षी पाठविले जातात.

३.२ रयत सेवक को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी :

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यानी रयत शिक्षण संस्थेच्या सेवकांच्या आर्थिक अडचणी दूर करण्याच्या दृष्टीने तसेच ठेवींच्या रूपाने आर्थिक बचत करून रयत शिक्षण संस्थेतील सेवक स्वावलंबी व्हावा या दृष्टीने दिनांक १६ ऑगस्ट, १९४० रोजी "दि रयत सेवक को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी, सातारा" ही सहकारी संस्था स्थापन केली. सदर सोसायटीचे दिनांक २१ ऑक्टोबर, १९६९ रोजी बँकेत रूपांतर झाले.

रयत सेवक को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या प्रगतीची आकडेवारी तक्ता ३.२ मध्ये दर्शविली आहे.

तक्ता : २ - २

रयत सेवक को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड, सातारा ची प्रगती

| वर्ष | सभासद | भाग भांडवल [रु.] | राखीव व इतर निधी [रु.] | सर्व प्रकारच्या ठेवी [रु.] | कर्ज [रु.] | सोसायटीने गुंतविलेली रक्कम [रु.] | नफा [रु.] | लाभांशाचा दर [रु.] | बँक/ रोख कर्ज [कॅश क्रेडिट] |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९४०-४१ | १९० | १,५४६ | १९८ | ४०० | १,८०० | – | – | नफा वाटला नाही | – |
| १९४१-४२ | ३०७ | ३,९८३ | ३११ | ४,५५१ | ६,५०८ | १०० | १०४ | नफा वाटला नाही | – |
| १९४२-४३ | ३९४ | ४,६९४ | ४२२ | २,७७७ | ६,९२७ | २५० | ४९८ | नफा वाटला नाही | – |
| १९४३-४४ | ४६० | ८,७१९ | ६४६ | ४,५०९ | १६,७४३ | २५० | २३७ | नफा वाटला नाही | ३,००० |
| १९४४-४५ | ५०४ | १०,३१५ | ७११ | ५,७८४ | १५,०७५ | २५० | ७२९ | नफा वाटला नाही | – |
| १९४५-४६ | ५२८ | ११,३७५ | ७३९ | ४,४२८ | ३३,६७३ | २५० | ६१८ | नफा वाटला नाही | २०,७५० |
| १९४६-४७ | ५३३ | १४,३२५ | ७४५ | २,९२२ | ४०,३३१ | २५० | ४९४ | नफा वाटला नाही | २०,३३० |
| १९४७-४८ | ७७५ | १४,९३२ | २,१७९ | ५,५५६ | ३१,५२६ | २५० | ७८० | नफा वाटला नाही | १९,९५० |
| १९४८-४९ | ७६७ | १७,८८७ | ४,१८४ | १३,२९६ | ३४,७६५ | २५० | १,३६९ | नफा वाटला नाही | ३,८८१ |
| १९४९-५० | ८६९ | २२,७०३ | ५,५२८ | ४०० | २८,३६५ | ३०० | १,४२५ | नफा वाटला नाही | – |
| १९५०-५१ | ८६९ | २४,८२६ | ५,६८६ | २४१ | २९,७१६ | ३०० | १,४४५ | नफा वाटला नाही | – |
| १९५१-५२ | ८६० | २७,२९० | ९,०७९ | २४२ | ३६,५५० | ३०० | ९४४ | ३. १२ | – |
| १९५२-५३ | ७२७ | ३०,१५४ | ९,०३२ | ३७ | ४८,२०९ | ३०० | १,२११ | २. ५० | ८,८९८ |
| १९५३-५४ | ७३३ | ३३,७१० | ९,३३६ | १३४ | ५७,३४२ | ७५० | २,८११ | ३. १२ | १२,८४२ |
| १९५४-५५ | ६६९ | ३३,६८७ | १०,४६९ | २८१ | ७४,०९८ | ७५० | ३,०६५ | ३. १२ | २८,७११ |
| १९५५-५६ | ५३० | ३४,३३७ | ११,४९९ | १६,८१४ | ६७,५९८ | ७५० | ३,४६३ | ३. १२ | ३,६९० |
| १९५६-५७ | ४४३ | ३४,९९४ | १२,४१३ | ४३,०४५ | ९०,९८६ | ७५० | ३,६१५ | ५. ०० | |
| १९५७-५८ | ४५२ | ४०,११२ | १३,३५४ | ७०,९०७ | ९८,२२७ | २५,७५० | ३,५६९ | ४. ०० | – |
| १९५८-५९ | ४२२ | ४९,०९० | १५,३४८ | ७९,८३२ | १,३५,०७४ | २५,७५० | ४,४६७ | ४. ५० | १४,६६९ |
| १९५९-६० | ४७९ | ६०,६४३ | १७,४१६ | ९५,१२१ | १,४९,८२१ | २६,२५० | ४,९१८ | ५. ०० | २,५५५ |
| १९६०-६१ | ५३५ | ७३,५४५ | १८,१२५ | १,१९,७३५ | २,१७,१९६ | २६,२५० | ६,१५२ | ५. ५० | ३०,४४५ |
| १९६१-६२ | ५९२ | ८६,७८० | १९,७७८ | १,५२,८०६ | १,७६,५८७ | ८६,७५० | ७,३६२ | ६. ०० | – |
| १९६२-६३ | ७४५ | १,०८,६८० | २१,६५१ | २,६४,५१२ | २,६१,१०७ | ९१,७५० | ८,८७९ | ६. ०० | – |
| १९६३-६४ | ८४० | १,२६,०२६ | २३,९८६ | २,९४,२७३ | ३,५७,८९७ | ९१,७५० | १२,२५२ | ६. ०० | – |
| १९६४-६५ | १००८ | १,५७,९९५ | २७,२३५ | ३,७१,५४० | ४,१३,१२२ | १,०२,७५० | १४,१४० | ६. ०० | – |
| १९६५-६६ | ११७९ | २,०४,९२४ | ३०,९६८ | ४,१५,६३७ | ५,२७,७४४ | १,०२,७५० | १४,४८६ | ५. ०० | – |
| १९६६-६७ | १४३० | २,५५,३८२ | ३४,९३६ | ४,६०,४११ | ६,०२,०३६ | १,०२,७५० | १५,४३१ | ४. ०० | – |
| १९६७-६८ | १७५९ | ३,३५,२६१ | ३९,२५५ | ५,७२,०१६ | ७,४२,३१२ | १,२२,७५० | २२,४०६ | ४. ५० | – |
| १९६८-६९ | १९९२ | ४,२७,५०० | ४५,६५९ | ८,३०,८५८ | ७,२३,०७६ | ३,७५,७५० | २५,८०९ | ४. ०० | – |

संदर्भ : २९ वा वार्षिक अहवाल, १९६८ - ६९

तक्ता ३.२ वरून "रयत सेवक को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या प्रगतीची आकडेवारी समजू शकते.

१) सभासद :

१६ ऑगस्ट, १९४० रोजी या सोसायटीची स्थापना झाली. त्या-साली सभासद संख्या १९८ इतकी होती. १९५०-५१ पर्यंत सोसायटीची सभासद संख्या सतत वाढलेली दिसते. त्यानंतर १९५८-५९ पर्यंत सभासद संख्या घटत गेल्याचे दिसते. कारण काही सभासद सेवानिवृत्त झाल्याने त्यांचे सभासदत्व रद्द करावे लागले. १९५९-६० पासून मात्र १९६८-६९ पर्यंत सभासद संख्या सतत वाढत गेल्याचे दिसते. कारण संस्थेचा कर्मचारी वर्ग वाढत गेल्याने व त्यांनी सोसायटीचे सभासदत्व स्वीकारल्याने सभासद संख्या वाढत गेली.

२) भाग भांडवल व वर्गणी :

सोसायटीच्या स्थापनेवेळी, म्हणजे १९४०-४१ साली, सोसायटीचे भाग भांडवल १,५४९/- रुपये होते. १९४२-४३ ला फक्त ही रक्कम कमी झालेली दिसते. कारण सेवा निवृत्त झालेल्या आणि राजीनामा दिलेल्या सभासदांची वर्गणी परत करावी लागली. त्यानंतर मात्र भाग भांडवलात सतत वाढ होत गेल्याचे दिसून येते. १९६८-६९ मध्ये भाग भांडवल व वर्गणी ४,२७,५०० रुपये होती.

३) राखीव व इतर निधी :

सोसायटीचा १९४०-४१ साली राखीव फंड व इतर निधी १९८/- रुपये होता. त्यामध्ये त्यानंतर सतत वाढ होत गेल्याचे दिसते. तो

१९५०-५१ ला ७,६८६/- रुपये, १९६०-६१ साली १८,१२५/- रुपये आणि १९६८-६९ साली ४५,६५९/- रुपये झाला. नफ्याचा काही भाग प्रत्येक वर्षी राखीव निधीत जमा केला जात असल्यानेही तो सतत वाढत होता.

४) सर्व प्रकारच्या ठेवी :

सोसायटीच्या सथानावर्षी, म्हणजे १९४०-४१ साली, तिच्या सर्व प्रकारच्या ठेवी ४००/- रुपये होत्या. अर्थात त्यावेळी सभासद संख्याही कमी होती आणि अनेक प्रकारच्या ठेवींची सुविधा नव्हती. नंतरच्या काळात ठेवींच्या आकडेवारीत चढउतार झालेले दिसतात. १९५२-५३ ला तर फ फक्त ३७/- रुपये एवढीच ठेव होती. सभासदांनी ठेवी काढल्याने, सभासदांनी राजीनामे दिल्याने आणि सभासद सेवानिवृत्त झाल्याने ठेवी कमी झालेल्या होत्या. १९५३-५४ पासून मात्र सोसायटीच्या सर्व प्रकारच्या ठेवी वाढलेल्या दिसून येतात. संस्थेचा कर्मचारी वर्ग आणि परिणामी सभासद संख्या वाढत राहिल्याने ठेवी वाढत गेल्या. १९६८-६९ साली ८,३०,८५८/- रुपयांच्या ठेवी होत्या.

५) कर्ज :

सोसायटीने १९४०-४१ साली सभासदांना १,८००/- रुपयांचे कर्ज दिले होते. त्यानंतरच्या काळातही सभासदांची गरज लक्षात घेवून त्यांच्या मागणीप्रमाणे कर्जपुरवठा केला आहे. १९५०-५१ ला २९,७१६/- रुपयांचा १९६०-६१ साली २,१७,१९६/- रुपयांचा आणि १९६८-६९ साली ७,२३,०७६/- रुपयांचा कर्जपुरवठा केला होता.

६) गुंतविलेल्या रकमा :

सोसायटीने १९४१-४२ पासून रकमा गुंतविण्यास सुरुवात केलेली दिसून

येते. यासाली संस्थेने १०० रुपयांची गुंतवणूक केली होती. १९५०-५१ ला सोसायटीने ३००/- रुपये, १९६०"६१ साली २६,२५०/- रुपये आणि १९६८-६९ मध्ये ३,७७,७५० रुपये गुंतविले होते. सोसायटीने प्रामुख्याने दि सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि, सातारा, नॅशनल प्लॅन सेव्हिंग्ज कॅश सर्टिफिकेटस् आणि दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि. मुंबई यांच्याकडे गुंतवणूक केली होती.

७) नफा :

सन १९४१-४२ साली सोसायटीचा नफा १०४/- रुपये होता, ते १९५०-५१ साली १,४४५/- रुपयांपर्यंत वाढला. जेव्हा कर्जाचे प्रमाण व गुंतवणूक कमी झाली आहे तेव्हा सोसायटीचा नफा कमी झालेला दिसतो. १९५२-५३ पासून सोसायटीचा नफा सतत वाढत गेल्याचे दिसून येते. १९६८-६९ साली सोसायटीला २५,८०९/- रुपये एवढा नफा झाला होता.

८) लाभांशाचा दर :

सोसायटीने स्थापनेपासून १९५०-५१ पर्यंत सभासदांना नफा वाटला नव्हता. १९५१-५२ साली सोसायटीने ३.१२ रुपये दराने सभासदांना लाभांश वाटला. १९६०-६१ साली ५.५० रुपये दराने तर १९६८-६९ मध्ये ४.०० रुपये दराने लाभांश वाटला होता.

९) बँक कॅश क्रेडिट :

सोसायटीकडे १९४३-४४ साली बँक कॅश क्रेडिट ३,०००/- एवढे होते. १९४९-५० ते १९५१-५२ या काळात सोसायटीकडे कॅश क्रेडीट काहीही नव्हते. त्याचप्रमाणे १९५७-५८ सालीही काहीही नव्हते. १९५८-५९ साली १४,६६९/-

रुपये तर १९६०-६१ साली ३०,४४५ रुपये एवढे होते. त्यानंतर मात्र काहीही काहीही नसल्याचे दिसून येते.

सन १९४२-४३ पासून सोसायटी सतत "अ" वर्गात होती. रयत सेवक को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीचे दि.२१ ऑक्टोबर, १९६९ रोजी बँकेत रुपांतर झाले.

### ३.३ रयत सेवक सहकारी बँकेची आर्थिक बैठक : (१९६८-६९ ते १९९१-९२)

#### ३.३.१ भाग भांडवल :

भाग भांडवल हा बँकेचा महत्त्वपूर्ण घटक असून बँकेच्या ताळेबंदात तो देयता या बाजूला असतो. बँकेच्या भांडवल उभारणीमध्ये भाग-भांडवलाल अतिशय महत्त्व असते. बँकेने जास्तीत जास्त किती भांडवल उभा करावयाचे त्याची अंतिम मर्यादा निश्चित केलेली असते. आणि ती निश्चित झालेली रक्कम म्हणजे "अधिकृत भांडवल" होय. अधिकृत भांडवलाच्या रकमेत बँकिंग कायद्यातील अटीनुसार कालोतराने वाढ होत जाते. अधिकृत भांडवलापैकी जेवढे भाग विक्रीस काढले जातात त्याला "विक्रीस काढलेले भांडवल" म्हणतात. बँक आपली व्यावसायिक गरज विचारात घेऊन भाग-भांडवल विक्रीस काढते. या विक्रीस काढलेल्या भांडवलापैकी जेवढे भाग भागधारकांमध्ये खपलेले असतात त्याला "खपलेले भांडवल" म्हणतात. विक्री झालेल्या भाग भांडवलापैकीप्रत्यक्ष जे भांडवल वसूल झालेले असते त्याला "वसूल"भागभांडवल" म्हणतात. या वसूल भाग भांडवलाला बँकेच्या आर्थिक व्यवहारात खूप महत्व असते. बँकेचे हेच खरे भांडवल असते.

दि रयत सेवक को-ऑपरेटिव्ह बँकेचे सुरुवातीचे अधिकृत भांडवल

५ लाख रुपये होते आणि त्यावेळी, म्हणजे १९६८-६९ साली, प्रत्येक भागाची किंमत १० रुपये होती. १९७२-७३ पासून प्रत्येक भागाची किंमत ५०/- रुपये करण्यात आली. बँकेचे भागधारक हे "रयत शिक्षण संस्थेतील" कर्मचारीच आहेत. बँकेचे अधिकृत भागभांडवल ५ लक्ष रुपये होते ते १९९१-९२ साली ५ कोटी रुपये एवढे झाले. ही वाढ १०० पटींची आहे. १९६९-७० १९७३-७४, १९७५-७६, १९८०-८१, १९८२-८३ आणि १९८४-८५ या वर्षामध्ये अधिकृत भांडवलाची मर्यादा वाढवून घेण्यात आली. १९६८-६९ पासून ते १९९१-९२ पर्यंत बँकेच्या अधिकृत आणि वसूल भागभांडवलात कसकसा बदल होत गेला याची माहिती तक्ता ३.३ वरून मिळेल.

तक्ता : ३ - ३

रयत सेवक सहकारी बँकेचे अधिकृत आणि वसूल भाग भांडवल

[ १९६८–६९ ते १९९१–९२ ]

| वर्ष | अधिकृत भांडवल [रुपये] | वसूल भांडवल [रुपये] | वसूल भांडवलाचा निर्देशांक | वसूल भांडवलाची वार्षिक वाढ [टक्के] | वसूल भांडवलाची अधिकृत भांडवलाशी टक्केवारी | भागांची संख्या | निर्देशांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २ | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. |
| १९६८–६९ | ५,००,००० | ४,१८,४०० | १००.०० | – | ८३.६८ | ४१,८४० | १००.०० |
| १९६९–७० | १०,००,००० | ५,३३,३०० | १२७.४६ | २७.४६ | ५३.३३ | ५३,३३० | १२७.४६ |
| १९७०–७१ | १०,००,००० | ६,८२,८१० | १६३.२० | २८.०३ | ६८.२८ | ६८,२८१ | १६३.२० |
| १९७१–७२ | १०,००,००० | ८,३६,८६० | २००.०१ | २२.५६ | ८३.६९ | ८३,६८६ | २००.०१ |
| १९७२–७३ | १०,००,००० | ९,६३,६५० | २३०.३२ | २०.७० | ९६.३६ | १९,२७३ | ४६.०६ |
| १९७३–७४ | १५,००,००० | १२,१५,९६० | २९०.६२ | २६.१८ | ८१.०६ | २४,३१९.२ | ५८.१२ |
| १९७४–७५ | १५,००,००० | १४,७१,७१० | ३५१.७५ | २१.०३ | ९८.११ | २९,४३४.२ | ७०.३५ |
| १९७५–७६ | ५०,००,००० | १८,२३,०१० | ४३५.७१ | २३.८७ | ३६.४६ | ३६,४६०.२ | ८७.१४ |
| १९७६–७७ | ५०,००,००० | २३,१४,१६० | ५५३.१० | २६.९४ | ४६.२८ | ४६,२८३.२ | ११०.६२ |
| १९७७–७८ | ५०,००,००० | २८,९६,३१० | ६९२.२३ | २५.१६ | ५७.९३ | ५७,९२६.२ | १३८.४५ |
| १९७८–७९ | ५०,००,००० | ३६,६६,६४० | ८७६.३५ | २६.६० | ७३.३३ | ७३,३३२.८ | १७५.२७ |
| १९७९–८० | ५०,००,००० | ४५,६७,२१० | १०९१.५९ | २४.५६ | ९१.३४ | ९१,३४४.२ | २१८.३२ |
| १९८०–८१ | १,००,००,००० | ५६,६४,६१० | १३६१.०४ | २४.६८ | ५६.९५ | १,१३,८९२.२ | २७२.२१ |
| १९८१–८२ | १,००,००,००० | ७६,४९,५५० | १८२५.९० | ३४.१५ | ७६.३९ | १,५२,७९१ | ३६५.१८ |
| १९८२–८३ | २,००,००,००० | १,००,३५,७८० | २३९८.६१ | ३१.३७ | ५०.१८ | २,००,७१५.६ | ४७९.७२ |
| १९८३–८४ | २,००,००,००० | १,२९,२४,३५० | ३०८९.०० | २८.७८ | ६४.६२ | २,५८,४८७ | ६१७.८० |
| १९८४–८५ | ५,००,००,००० | १,६६,६१,२५० | ३९८६.९१ | २९.०७ | ३३.३६ | ३,३३,६२५ | ७९८.३८ |
| १९८५–८६ | ५,००,००,००० | २,१७,३४,८५० | ५१९४.७५ | ३०.३० | ४३.४७ | ४,३४,६९७ | १०३८.९५ |
| १९८६–८७ | ५,००,००,००० | २,७४,५५,४५० | ६५६२.०१ | २६.३२ | ५४.९१ | ५,४९,१०९ | १३१२.४० |
| १९८७–८८ | ५,००,००,००० | ३,३४,६४,१०० | ७९९८.११ | २१.८९ | ६६.९३ | ६,६९,२८२ | १५९९.६२ |
| १९८८–८९ | ५,००,००,००० | ४,०८,७८,८३० | ९७७०.२७ | २२.१६ | ८१.७६ | ८,१७,५७६.६ | १९५४.०५ |
| १९८९–९० | ५,००,००,००० | ४,०६,१४,५०० | ९७०७.१० | –००.६५ | ८१.२३ | ८,१२,२९० | १९४१.४२ |
| १९९०–९१ | ५,००,००,००० | ४,०५,२६,३०० | ९६८६.०२ | –००.२२ | ८१.०५ | ८,१०,५२६ | १९३७.२० |
| १९९१–९२ | ५,००,००,००० | ४,०४,३६,३०० | ९६६४.५१ | –००.२२ | ८०.८७ | ८,०८,७२६ | १९३२.९० |

संदर्भ : वार्षिक अहवाल १९६८–६९ ते १९९१–९२, दि रयत सेवक सहकारी बँक लि., सातारा.

३० जून, १९६९ अखेर बँकेचे १०/- रुपये किंमतीचे ४१,८४०/- भाग खपले आणि त्याद्वारे वसूल भागभांडवल ४,१८,४०० रुपये एवढे होते. १९८१-८२ च साली १,५२,७९१ भागांचे वसूल भांडवल ७६,३९,५५०/- रुपये होते. १९६९ च्या वसूल भांडवलाशी तुलना करता ही रक्कम १८ पटींनी वाढली. १९९१-९२ ला ८,०८,७२६ भागांचे वसूल भांडवल ४,०४,३६,३००/- रुपये एवढे होते. १९६८-६९ शी तुलना करता ही रक्कम ९६ पटींनी वाढली होती.

जून, १९६९ अखेर बँकेचे अधिकृत भांडवल ५,००,०००/- रुपये होते आणि वसूल भांडवल ४,१८,४०० रुपये होते. जून, १९९२ अखेर बँकेचे वसूल भागभांडवल ४,०४,३६,३००/- रुपयांपर्यंत वाढले. १९६८-६९ साली १०/- रुपये प्रमाणे ४१,८४०/- भाग खपले होते. १९८१-८२ अखेर ५०/- रुपये प्रमाणे १,५२,७९१ भाग खपले होते. तर १९९२ अखेर ८,०८,७२६ भाग खपले. या बदलाचा वार्षिक दर कसा होता ते आता पाहू, तसेच निर्देशांकही पाहू.

१) १९६९-७० साली वसूल भांडवलाची वार्षिक वाढ २७.४६ टक्के आणि १९७९-८० साली २४.६८ टक्के होती. १९७९-८० या वर्षात अधिकृत भांडवलाची मर्यादा वाढवून १ कोटी रुपये करण्यात आली. त्यामुळे टक्केवारीत घट झालेली आढळून येते. १९९०-९१ शी तुलना करता १९९१-९२ साली वसूल भाग भांडवल कमी झालेले दिसून येते. त्यामुळे वार्षिक वाढीची टक्केवारी उणे झालेली आहे.

२) १९६९-७० साली वसूल भांडवलाचा निर्देशांक १२७.४६ होता, तो १९७९-८० साली १,०९१.५९ तर १९९१-९२ साली ९,६६४.५१ होता. १९६९-७० शी तुलना करता ही वाढ ७५ पटींची आहे.

३) १९६८-६९ साली भागांची संख्या ४१,८४० होती, १९९१-९२ साली ती ८,०८,७२६ झाली. १९६९-७० साली भागांच्या संख्येचा निर्देशांक

१२७.४६ होता. तो १९९१-९२ साली १,९३२.९० झाला. म्हणजे ही वाढ १५ पटींची आहे.

४) १९६८-६९ साली वसूल भांडवलाची अधिकृत भांडवलाशी टक्केवारी ८३.६८ होती. १९७३-७४ साली ती ८१.०६ राहिली. अधिकृत भांडवलाची मर्यादा वाढल्याने ही टक्केवारी कमी झालेली दिसून येते. १९९१-९२ साली वसूल भांडवलाची अधिकृत भांडवलाशी टक्केवारी ८०.८७ होती.

१९६८-६९ साली बँकेचे अधिकृत भांडवल हे ५ लाख रुपये होते. १९६९-७० ते १९७२-७३ या काळात ते १० लाख एवढे करण्यात आले. १९७३-७४ व १९७४-७५ या दोन वर्षी ते १५ लाखापर्यंत गेले. बँकेने पुन्हा ही मर्यादा वाढवून १९७५-७६ ते १९७९-८० या काळात ५० लाखांपर्यंत आणि त्यानंतर १९८०-८१ व १९८१-८२ ला १ कोटी रुपयांपर्यंत नेली. ती पुढील दोन वर्षात २ कोटी आणि नंतर १९८४-८५ पासून ५ कोटी रुपये करण्यात आलेली आहे.

### ३.३.२ सभासद संख्या :

रयत सेवक सहकारी बँक ही रयत शिक्षण संस्थेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची बँक आहे. या संस्थेतील कर्मचारीच बँकेचे सभासद होऊ शकतात. अर्थात रयत शिक्षण संस्थेचा विस्तार मोठा असल्याने कर्मचारी वर्ग मोठा आणि त्यामुळे बँकेचे सभासदही बरेच आहेत. बँकेची सभासद संख्या जेवढी जास्त तेवढी बँकेची आर्थिक बैठक मजबूत होण्यास मदत होत असते. १९६८-६९ पासून ते १९९१-९२ पर्यंत सभासद संख्येत झालेला बदल तक्ता ३.४ मध्ये दाखविला आहे.

तक्ता ३.४

## रयत सेवक सहकारी बँकेची सभासद संख्या

| वर्ष (१) | सभासद संख्या (२) | निर्देशांक (३) | वार्षिक वाढ (टक्के) (४) |
|---|---|---|---|
| १९६८-६९ | १,९९२ | १००.०० | - |
| १९६९-७० | २,२०४ | ११०.६४ | १०.६४ |
| १९७०-७१ | २,६०६ | १३०.८२ | १८.२३ |
| १९७१-७२ | २,८४८ | १४२.९७ | ९.२९ |
| १९७२-७३ | ३,२२४ | १६१.८५ | १२.२० |
| १९७३-७४ | ३,६७१ | १८४.२८ | १३.८६ |
| १९७४-७५ | ४,०२५ | २०२.०५ | ९.६४ |
| १९७५-७६ | ४,५६२ | २२९.०१ | १३.३४ |
| १९७६-७७ | ५,२२५ | २६२.३० | १४.५३ |
| १९७७-७८ | ५,७३५ | २८७.९० | ९.७६ |
| १९७८-७९ | ६,१२४ | ३०७.४३ | ६.७८ |
| १९७९-८० | ६,६०६ | ३३१.६३ | ७.८७ |
| १९८०-८१ | ७,११४ | ३५७.१३ | ७.६९ |
| १९८१-८२ | ७,९१६ | ३९७.३९ | ११.२७ |
| १९८२-८३ | ८,४८२ | ४२५.८० | ७.१५ |
| १९८३-८४ | ९,१८८ | ४६१.२४ | ८.३२ |
| १९८४-८५ | ९,६२६ | ४८३.२३ | ४.७६ |
| १९८५-८६ | १०,२०७ | ५१२.४० | ६.०३ |
| १९८६-८७ | १०,७६५ | ५४०.४१ | ५.४६ |
| १९८७-८८ | ११,१०५ | ५५७.४८ | ३.१५ |
| १९८८-८९ | ११,६९० | ५८६.८५ | ५.२६ |
| १९८९-९० | १२,०९० | ६०३.४१ | २.८२ |
| १९९०-९१ | १२,३११ | ६१८.०२ | २.४२ |
| १९९१-९२ | १२,५६३ | ६३०.६७ | २.०४ |

संदर्भ - वार्षिक अहवाल, १९६८-६९ ते १९९१-९२, दि रयत सेवक सहकारी बँक लि, सातारा.

# रयत सेवक सहकारी बँकेची [1] सभासद संख्या



बँकेच्या एकूण सभासदांची वर्गवारी "अ" वर्ग सभासद आणि "ब" वर्ग सभासद अशी केली जाते. "अ" वर्ग सभासद म्हणजे बँकेचे व्यक्तिगत भागधारक होत. "ब" वर्ग सभासद म्हणजे असे सभासद की ज्यांची नोंद त्यांनी बँककडून घेतलेल्या कर्ज कालखंडापुरतीच असते. बँकेचे कर्ज फेडले म्हणजे त्यांचे सभासदत्व संपुष्टात येते. "ब" वर्ग सभासदांना मतदानाचा अधिकार नसतो. "ब" वर्ग सभासदांचा समावेश हा बँकेच्या कर्जव्यवहारात असतो.

"रयत सेवक सहकारी बँक" ही "रयत शिक्षण संस्थेतील कर्मचाऱ्यांची बँक असल्याने खाजगी व्यक्तींना सभासदत्व दिले जात नाही, आणि त्यामुळेच बँकेचे सर्व सभासद "अ" वर्गात मोडतात. रयत शिक्षण संस्थेतील कर्मचाऱ्यास बँकेचे सभासदत्व देताना त्याची संस्थेत सलग दोन वर्षे सेवा झालेली असावी अशी अट असते.

१९६८-६९ साली रयत सेवक सहकारी बँकेची सभासद संख्या १,९९२ होती, १९७८-७९ साली ती ६,१२४ झाली. म्हणजे या दहा वर्षात सभासद संख्या तिपटीपेक्षा जास्त वाढली आहे. १९८८-८९ या साली सभासद संख्या ११,६९० झाली. १९६८-६९ या सालातील सभासद संख्येशी तुलना करता ही वाढ साडेपाच पटीपेक्षा जास्त आहे. १९९१-९२ या वर्षी बँकेची सभासद संख्या १२,५६३ होती. १९६८-६९ शी तुलना करता ही वाढ सहा पटीपेक्षा जास्त आहे. तक्त्यावरून असे दिसून येते की, १९६८-६९ ते १९९१-९२ या काळात सभासद संख्या सातत्याने वाढत गेलेली आहे.

१९६९-७० साली बँकेच्या सभासद वाढीचा निर्देशांक ११०.६४ एवढा होता. १९६९-७० ते १९७९-८० या काळात सभासद वाढीचा निर्देशांक ११० ते ३३१ या दरम्यान आहे. १९९१-९२ साली निर्देशांक ६३०.६७ एवढा होता. संपूर्ण अध्ययन कालखंडात निर्देशांक कधीही घटलेला नाही.

सभासद संख्येच्या वार्षिक वाढीच्या टक्केवारीत मात्र चढउतार झाल्याचे दिसून येते. १९६९-७० मध्ये सभासद संख्येची वार्षिक वाढ १०.६४ टक्के होती. १९७१-७२ ला ती कमी होऊन ९.२९ टक्के झालेली दिसते. १९७६-७७ ला ती पुन्हा वाढून १४.५३ टक्के झाली. त्यानंतरही सभासद संख्येच्या वार्षिक टक्केवारीत चढउतार झाल्याचे दिसून येते. १९९१-९२ साली ही वाढ २.०४ टक्के असल्याचे दिसून येते. १९९१-९२ साली ही वाढ २.०४ टक्के असल्याचे दिसून येते. सभासद संख्येच्या वार्षिक वाढीची टक्केवारी कमी होण्याची कारणे म्हणजे, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे सभासदत्व रद्द करावे लागले, बँकेच्या सभासदांचा सभासदत्वाचा राजीनामा, रयत शिक्षण संस्थेच्या नोकरीचा राजीनामा, मयत सभासद या कारणांमुळे वार्षिक वाढ कमी होत गेलेली दिसते. याशिवाय महत्त्वाचे म्हणजे १९९१-९२ साली रयत शिक्षण संस्थेचा सेवक वर्ग हा १४,७३४ एवढा होता, पैकी १२,५६३ सेवक बँकेचे सभासद झालेले होते. त्यामुळेही सभासद संख्येच्या वार्षिक वाढीची टक्केवारी कमी राहिलेली आहे.

### ३.३.३ खेळते भांडवल :

बँकेचे भाग भांडवल, राखीव आणि इतर निधी, सर्व प्रकारच्या ठेवी, अन्य वित्तीय संस्थाकडून घेतलेल्या रकमा, वटविण्यास आलेली बिले, कर्जावर मिळणारे व्याज वगैरे घटकांचा खेळत्या भांडवलात समावेश होतो. खेळत्या भांडवलावरून बँकेची आर्थिक क्षमता समजून येते. म्हणजेच वाढत्या खेळत्या भांडवलामुळे बँकेची कर्जदेयक्षमता, गुंतवणूकक्षमता वाढत राहते.

१९६८-६९ ते १९९१-९२ या काळातील रयत सेवक सहकारी बँकेच्या खेळत्या भांडवलातील बदल तक्ता ३.५ मध्ये दर्शविला आहे.

तक्ता ३.५

## रयत सेवक सहकारी बँकेचे खेळते भांडवल

(१९६८-६९ ते ९१-९२)

| वर्ष (१) | खेळते भांडवल (रूपये) (२) | निर्देशांक (३) | प्रतीवर्षी वाढ(टक्के) (४) |
|---|---|---|---|
| १९६८-६९ | १३,३४,९७८ | १००.०० | - |
| १९६९-७० | १७,५९,५८५ | १३१.८० | ३२.५६ |
| १९७०-७१ | २२,२१,१०२ | १६६.३८ | २६.२३ |
| १९७१-७२ | २७,८७,११२ | २०८.७८ | २५.४९ |
| १९७२-७३ | ३०,०९,५०७ | २२५.४३ | ०७.९८ |
| १९७३-७४ | ४०,५७,२५७ | ३०३.९२ | ३४.८१ |
| १९७४-७५ | ४७,७७,३०२ | ३५७.८६ | १७.७५ |
| १९७५-७६ | ५८,२१,४८७ | ४३६.०७ | २१.८६ |
| १९७६-७७ | ७४,१५,९३६ | ५५५.५१ | २७.३९ |
| १९७७-७८ | ९०,०८,९२१ | ६७४.५४ | २१.४३ |
| १९७८-७९ | १,१७,६६,२५९ | ८८१.३८ | ३०.६६ |
| १९७९-८० | १,५३,५०,८७० | १,१४९.९० | ३०.४७ |
| १९८०-८१ | २,२०,३०,११७ | १,६५०.२२ | ४३.५१ |
| १९८१-८२ | २,९४,३९,५१३ | २,२०५.२५ | ३३.६३ |
| १९८२-८३ | ४,०८,६४,०५२ | ३,०६१.०२ | ३८.८१ |
| १९८३-८४ | ४,८५,५९,८२३ | ३,६३७.५० | १८.८३ |
| १९८४-८५ | ५,३६,१८,७६२ | ४,०४१.४३ | १०.८३ |
| १९८५-८६ | ७,३६,८६,८७५ | ५,५११.७१ | ३६.९२ |
| १९८६-८७ | ८,५७,०४,४३६ | ६,४१९.११ | १६.३१ |
| १९८७-८८ | ९,२५,८०,३८० | ६,९३४.९७ | ०८.०२ |
| १९८८-८९ | १४,६१,३४,४८० | १०,९४६.५८ | ५७.८५ |
| १९८९-९० | १८,११,११,२६६ | १३,६२६.५४ | २४.४८ |
| १९९०-९१ | २०,४४,२९,००० | १५,३१३.२९ | १२.३८ |
| १९९१-९२ | २०,८०,१३,००० | १५,५८१.७५ | ०१.७५ |

संदर्भ - तत्रैव

# बँकचे खेळते भांडवल

## 2



१९६८–६९ साली रयत सेवक सहकारी बँकेचे खेळते भांडवल १३,३४,९७८ रुपये होते. १९९१–९२ ला ते २०,८०,१३,००० रुपये झाले. बँकेच्या खेळत्या भांडवलात १९६८–६९ ते १९९१–९२ या काळात सतत वाढ होत गेल्याचे दिसून येते. १९६८–६९ ते १९९१–९२ या काळात सतत वाढ होत गेल्याचे दिसून येते. १९६८–६९ ते १९९१–९२ पर्यंत खेळत्या भांडवलात १५५ पटींनी वाढ झाली. १९८०–८१ साली बँकेचे खेळते भांडवल २,२०,३०,११७ रुपये होते. १९६८–६९ च्या खेळत्या भांडवलाशी तुलना करता खेळते भांडवल साडे सोळा पटींनी वाढले होते. १९८७–८८ साली खेळते भांडवल ९,२५,८०,३८० रुपये होते. १९६८–६९ शी तुलना करता ही वाढ ६९ पटींपेक्षा जास्त आहे. एकंदरित, १९६८–६९ ते १९९१–९२ या काळात रयत सेवक सहकारी बँकेचे खेळते भांडवत सतत वाढत गेल्याचे दिसून येते.

रयत सेवक सहकारी बँकेचा खेळत्या भांडवलाचा निर्देशांक १९६९–७० साली १३१.८० होता, तो १९७९–८० पर्यंत, म्हणजे दहा वर्षात, १,१४९.९० पर्यंत वाढला तर १९९१–९२ पर्यंत तो १५,५८१.७५ एवढा झालेला दिसून येतो. १९६८–६९ ते १९९१–९२ या चोवीस वर्षात रयत सेवक सहकारी बँकेच्या खेळत्या भांडवलाचा निर्देशांक सतत वाढत गेल्याचेच दिसून येते.

१९६९–७० साली रयत सेवक सहकारी बँकेच्या खेळत्या भांडवलाची वाढ ३२.५६ टक्के होती. १९८०–८१ साली ही वाढ ४३.५१ टक्के असल्याचे दिसून येते. १९८७–८८ साली ती फक्त ८.०२ टक्के होती. १९६९–७० च्या वाढीशी तुलना करता ही टक्केवारी फारच कमी असल्याचे दिसून येते. १९९१–९२ साली बँकेच्या खेळत्या भांडवलाची वार्षीक वाढीची टक्केवारी केवळ १.७५ राहिली.

रयत सेवक सहकारी बँकेच्या खेळत्या भांडवलाची वार्षिक वाढीची टक्केवारी १९६८ ते १९९१-९२ या काळात कमीअधिक होत गेल्याचे दिसून येते. अर्थात वार्षिक वाढीची टक्केवारी काही वेळा कमी झालेली असली तरी खेळते भांडवल मात्र वाढत गेल्याचेच दिसते

३.३.४ ठेवींचे संकलन :

ठेवी मोठ्या प्रमाणात गोळा करणे हे कोणत्याही बँकेचे महत्त्वाचे आणि प्राथमिक कार्य असते. कारण बँक ही प्रामुख्याने दुसऱ्यांच्या पैशाचा व्यापार करणारी संस्था असते. बँकेने भाग भांडवलाच्या रूपाने जमा केलेला पैसा तिच्या एकंदर व्यवसायासाठी अपुरा असतो. एवढेच नव्हे तर, या भाग भांडवलात कालांतराने फार हळूहळू वाढ होते. यास्तव बँकेला आपल्या व्यवसायासाठी पर्यायी मार्गाने पैसा मिळवावा लागतो. हे पर्यायी साधन म्हणजे ठेवी होय. बँक जेवढ्या जास्त ठेवी गोळा करू शकेल तेवढा जास्त कर्जाचा व्यवहार तिला करता येईल, आणि त्यातून जास्त नफा मिळविता येईल.

ठेवी गोळा करतानाही अल्पकालीन आणि दीर्घकालीन ठेवी यांच्यामध्ये योग्य तो मेळ बँकेला घालावा लागतो. दीर्घ मुदतीच्या ठेवी जेवढ्या जास्त मिळतील तेवढी कर्जाचे व्यवहार करण्यातील सुकरता जास्त, आर्थिक स्थैर्य जास्त आणि रोख रक्कम कमी बाळगली तरी चालते. ठेवींचे संकलन वेगाने वाढल्यास बँकेची आर्थिक प्रगती वेगाने होण्यास मदत होते.

या पार्श्वभूमीवर रयत सेवक सहकारी बँकेच्या कार्याचा आढावा घेऊ या. बँकेने अल्पकालीन आणि दीर्घकालीन ठेवी मोठ्या प्रमाणात मिळविण्याकरिता वेगवेगळ्या आकर्षक ठेव योजना कार्यान्वित केल्या आहेत. प्रथम त्यांची थोडक्यात माहिती दिलेली आहे. त्यानंतर प्रत्यक्ष ठेवींच्या बदलाचे विश्लेषण केले आहे.

३.३.४.१ ठेवींच्या योजना :

बँकेला आपला व्यवसाय कार्यक्षम करण्यासाठी ठेवी गोळा कराव्या लागतात. त्यासाठी बँकेची ठेवींची योजना आकर्षक असणे आवश्यक असते. रयत सेवक सहकारी बँकेने पुढीलप्रमाणे ठेव योजना निर्माण केल्या आहेत.

अ) दीर्घ मुदतीच्या ठेवी :

"रयत सेवक सहकारी बँक" ही "रयत शिक्षण संस्थेतील कर्मचा-यांची बँक असल्याने या बँकेत या संस्थेतील कर्मचारी आणि रयत शिक्षण संस्थेच्या ठेवी असतात. तसेच सक्तीच्या मुदतबंद ठेवीचाही समावेश यामध्ये होतो. या संदर्भातील रयत सेवक सहकारी बँकेतील योजनांचा थोडक्यात तपशील पुढे दिला आहे.

१) मुदत ठेव :

या प्रकारच्या ठेवींमध्ये रयत शिक्षण संस्थेतील कर्मचारी व रयत शिक्षण संस्था आपल्या ठेवी ठेवीत असतात. विशिष्ट प्रकारच्या मुदतीसाठी अशा ठेवी ठेवल्या जातात. ४६ दिवसांपासून ते एक वर्ष, दोन वर्षे, पाच वर्षे, दहा वर्षे अशा मुदतीसाठी या ठेवी ठेवल्या जातात. शक्यतो मुदत संपल्यानंतरच या प्रकारच्या ठेवीतील रक्कम ठेवीदारास काढता येते. सध्या ही बँक या प्रकारच्या ठेवींवरती पुढीलप्रमाणे व्याज देत असते.

| | |
|---|---|
| अ) ४६ दिवस ते १८० दिवस | १३.०० टक्के |
| ब) १८० दिवस ते एक वर्षाहून कमी | १३.२५ टक्के |
| क) एक वर्ष व त्याहून अधिक | १३.५० टक्के |

LIBRARY KOLHAPUR

२) प्रॉव्हिडंड फंड रिकरिंग ठेव योजना :

या प्रकारच्या ठेवींमध्ये रयत शिक्षण संस्थेतील ज्या कर्मचाऱ्यांच्या ठेवी सरकारकडील प्रॉव्हिडंट फंडात जात नाहीत त्या बँक स्वत:कडे जमा करते. अगदी जुन्या कर्मचाऱ्यांच्या ठेवीच फक्त यामध्ये आहेत. कारण अलीकडे प्रॉव्हिडंट फंड सरकारकडे जमा होत आहे. त्यामुळे नवीन कर्मचाऱ्यांच्या ठेवी या बँकेत असत नाहीत.

३) रयत संचित बचत ठेव योजना :

रयत सेवक सहकारी बँकेने या प्रकारच्या ठेवींची सोय सन १९७६-७७ पासून केली आहे. या प्रकारात दरमहा ठराविक रक्कम रुपये ५ किंवा त्याच्या पटीत ठेवल्यास मुदतीनंतर व्याजासहित रक्कम मिळते. या ठेव योजनेची वैशिष्टये पुढीलप्रमाणे आहेत.

अ) ठेवीवर योग्य व्याज :

आ) ठेवींना विम्याने संरक्षण

इ) ठेवीच्या तारणावर कर्ज देण्याची सोय

ई) संस्थेच्या सेवकांना ठेवीच्या रकमा पगार कपातीतून पाठविण्याची सोय.

४) चक्रवाढ व्याज मुदत ठेव योजना :

मुद्दलावर व्याज व व्याजावरही व्याज मिळवून देणारी ही योजना आहे. या योजनेत ठराविक रक्कम एकदम गुंतवावी लागते आणि मुदत संपल्यानंतर एकदम रक्कम परत मिळते. या ठेव प्रकारातील मुदतीनंतर मिळणारी रक्कम पुढील प्रमाणे असते -

अ) ३ वर्षे २० दिवस - दाम दीडपट

आ) ५ वर्षे २ महिने २० दिवस - दाम दुप्पट

इ) ८ वर्षे ३ महिने ९ दिवस - दाम तिप्पट

बँकेने ही योजना १९८०-८१ पासून सुरु केली आहे.

५) शुभमंगल ठेव योजना :

आपल्या मुलामुलींचे लग्न करण्यासाठी रक्कम मिळावी म्हणून या योजनेत दरमहा २५ रुपये १० वर्षासाठी नियमित ठेवावे लागतात. ११ वर्षांनी मिळणारी रक्कम ६,६६०/- रुपये असते. तसेच १५ वर्षापर्यंत भरत राहिली तर सोळाव्या वर्षी १२,७००/- रुपये मिळतात. बँकेने आपल्या ठेवीदारांच्या हितासाठी ही योजना सन १९८१-८२ पासून सुरु केली आहे.

६) पेन्शन ठेव योजना :

रयत शिक्षण संस्थेतील कर्मचाऱ्यांसाठी त्यांना सेवानिवृत्तीनंतरही दरमहा रक्कम मिळत राहावी म्हणून बँकेने ही योजना सन १९८१-८२ पासून सुरु केली आहे. या योजनेत सेवकांनी दरमहा १०/- रुपये अगर त्याच्या पटीत रक्कम गुंतवावी लागते. दरमहा गुंतविलेल्या रकमेच्या दुप्पट रक्कम १२१ व्या महिन्यापासून तहहयात मिळत राहते. एवढेच नव्हे तर सेवकाच्या वारसांना-देखील तहहयात मिळत राहते. एखाद्यास १२१ व्या महिण्यापासून पेन्शन नको असेल तर रयत बचत ठेव योजनेतील दराप्रमाणे होणारी रक्कम एकदम देण्याची सोय आहे.

७) कर्मवीर कॅश सर्टिफिकेटस् :

ही योजना "रयत सेवक सहकारी बँकेने"सन १९८९-९० पासून सुरु केलेली आहे. यामध्ये एकदम रक्कम १० च्या पटीत गुंतवावी लागते. या योजनेनुसार

रुपये १००/- च्या गुंतवणुकीस मुदतीनंतर मिळणारी रक्कम पुढे दर्शविली आहे.

| मुदत (महिने) | रक्कम (रुपये) |
|---|---|
| १२ | ११४.२० |
| २४ | १३०.४० |
| ३६ | १४८.९५ |
| ४८ | १७०.१० |
| ६० | १९४.२५ |
| ७२ | २२१.८० |
| ८४ | २५३.३० |
| ९६ | २८९.२५ |
| १०८ | ३३०.४५ |
| १२० | ३७७.२५ |

८) सभासद कायम ठेव योजना :

ही योजना रयत सेवक सहकारी बँकेने सन १९८९-९० पासून चालू केली आहे. या खात्यात बँकेच्या सभासदांची रक्कम दरमहा जमा होत असते. ही सक्तीची ठेव योजना असून प्रत्येक सभासदाचे दरमहा ११० रुपये पगार कपातीतून बँकेकडे पाठविले जातात.

आ) अल्पमुदतीच्या ठेवी :

१) चालू ठेवी : ही योजना बँकेने सन १९७७ पासून सुरु केली. या ठेवीत रयत शिक्षण संस्था आणि रयत शिक्षण संस्थेतील कर्मचारी यांच्या ठेवी असतात. या ठेवींचे व्यवहार करण्यावर मर्यादा नसल्याने या प्रकारच्या ठेवीवर बँक अगदी अल्प म्हणजे द.सा.द.शे. ०.५० टक्के व्याज देते.

२) बचत ठेव योजना : या योजनेतसुध्दा रयत शिक्षण संस्था आणि संस्थेतील कर्मचारी ठेवी ठेवीत असतात. या ठेवींतून आठवड्यातून दोन वेळा ठेवी काढण्यास परवानगी असते. या ठेवीवरती बँक सध्या द.सा. द.शे. ७.०० टक्के व्याज देत आहे.

३.३.४.२ ठेवींचे वार्षिक संकलन :

रयत सेवक सहकारी बँकेने सुरुवातीपासून ठेवींच्या संकलनाकडे कटाक्षाने लक्ष दिलेले दिसून येते. १९६८-६९ ते १९९१-९२ या काळात ठेवींमध्ये वार्षिक वाढ कशी होत गेली याची माहिती तक्ता ३.६ मध्ये दिलेली आहे.

तक्ता ३.६

रयत सेवक सहकारी बँकेचे वार्षिक ठेवी संकलन (१९६८-६९ ते १९९१-९२)

| वर्ष | एकूण ठेवी (सर्व प्रकारच्या)(रु) | निर्देशांक | वार्षिक वाढ (टक्के) |
|---|---|---|---|
| १९६८-६९ | ८,३०,८५७ | १००.०० | — |
| १९६९-७० | ११,२७,६८३ | १३५.७३ | ३५.७३ |
| १९७०-७१ | १४,०५,६२२ | १६९.१८ | २४.६५ |
| १९७१-७२ | १७,९५,९३३ | २१६.१५ | २७.७७ |
| १९७२-७३ | २१,०३,५०९ | २५३.१७ | १७.१२ |
| १९७३-७४ | २५,६०,६८७ | ३०८.२० | २१.७३ |
| १९७४-७५ | २९,३९,९०१ | ३५३.८४ | १४.२५ |
| १९७५-७६ | ३४,८२,२५५ | ४१९.१२ | १८.४५ |
| १९७६-७७ | ४९,९२,५७६ | ६००.८९ | ४३.३७ |
| १९७७-७८ | ५१,८५,८११ | ६२४.१६ | १७.४९ |
| १९७८-७९ | ६९,८९,८२१ | ८४१.२८ | ३४.७८ |
| १९७९-८० | ९३,०९,५९५ | १,१२०.४८ | ३३.१८ |
| १९८०-८१ | १,२६,४१,२६३. | १,५२१.४७ | ३५.७८ |
| १९८१-८२ | १,३४,२०,७७४ | १,६१५.२९ | ०६.१७ |
| १९८२-८३ | २,०८,८६,०४३ | २,५१३.८० | ५५.६२ |
| १९८३-८४ | ३,२८,१८,२१५ | ३,९४९.१२ | ५७.१२ |
| १९८४-८५ | ३,४५,३७,५५६ | ४,१५६.८६ | ०५.२४ |
| १९८५-८६ | ३,४५,१८,६३० | ४,१५४.५६ | -००.०५ |
| १९८६-८७ | ४,२८,१४,६९४ | ५,१५३.०७ | २४.०३ |
| १९८७-८८ | ४,७०,००,५७२ | ५,६५६.८८ | ०९.७८ |
| १९८८-८९ | ५,६९,१८,३६२ | ६,८५०.५६ | २१.०९ |
| १९८९-९० | ८,६९,१८,३६२ | ९,६८१.०१ | ४१.३२ |
| १९९०-९१ | १०,४८,१६,१८६ | १२,६१५.४३ | ३०.३१ |
| १९९१-९२ | १३,११,६८,२८६ | १५,७८७.११ | २३.८८ |

संदर्भ – तत्रैव

# बँकेच्या एकूण ठेवी


Millions
A = १९६८-६९ , X = १९९१-९२
रुपये
0
20
40
60
80
100
120
140
160
A B C D E F G H I J K L M N O P Q R S T U V W X

तक्ता ३.६ मध्ये रयत सेवक सहकारी बँकेने सन १९६८-६९ ते १९९१-९२ या काळात संकलित केलेल्या ठेवी, त्यांचा निर्देशांक आणि वार्षिक वाढ टक्क्यांमध्ये दिलेली आहे. सन १९६८-६९ मध्ये रयत सेवक सहकारी बँकेच्या सर्व प्रकारच्या एकूण ठेवी ८,३०,८५७ रुपये होत्या, तर १९९१-९२ साली १३,११,६८,२८६ रुपये एवढया होत्या. ही वाढ १५७ पटींची आहे. १९६८-६९ पासून १९९१-९२ अखेर विविध कालखंडात ठेवीत झालेली वाढ बँकेची कार्यक्षमता दर्शविते.

सन १९६९-७० साली बँकेच्या ठेवींचा निर्देशांक १३५.७३ होता, तो १९७९-८० साली १,१२०.४८ झाला. या दशकात बँकेच्या ठेवींचा निर्देशांक ८.२५ पटींनी वाढलेला दिसून येतो. १९९१-९२ साली ठेवींचा निर्देशांक १५,७८७.११ झाला. १९६९-७० शी तुलना करता ही वाढ ११६ पटींची आहे. सन १९६८-६९ ते १९९१-९२ या काळात १९८५-८६ चा अपवाद वगळता र रयत सेवक सहकारी बँकेच्या ठेवींचा निर्देशांक सतत वाढत गेल्याचेच दिसून येते.

सन १९६९-७० साली बँकेच्या ठेवींची वार्षिक वाढीची टक्केवारी ३५.७३ होती. १९८५-८६ साली फक्त ठेवींच्या वार्षिक वाढीची टक्केवारी उणे झालेली दिसून येते. बँकेच्या वार्षिक वाढीच्या टक्केवारीमध्ये सतत चढ-उतार होत गेलेले आहेत. बँकेने अनेक लाभदायी योजना सुरु केलेल्या आहेत तर काही ठेवी सक्तीच्या आहेत. त्यामुळे बँकेकडील ठेवी सतत वाढत आहेत. बँक ठेवी गोळा करण्याकडे कटाक्षाने लक्ष देत असल्याचे दिसून येते.

### ३.३.४.३ ठेवींची संरचना :

सुरूवातीलाच सांगितल्याप्रमाणे बँकेकडील ठेवींमध्ये अल्पकालीन आणि दीर्घकालीन ठेवींची रचना कशी आहे आणि काळाच्या ओघात या संरचनेत कसे बदल झाले याचा अभ्यास करणे उद्बोधक ठरते.

तक्ता : ५ - ७

रयत सेवक सहकारी बँकेतील ठेवींची संरचना

| वर्ष | मुदत ठेवी [रु] | टक्के एकूण ठेवींशी | चालू ठेवी [रु] | टक्के ए. ठेवींशी | बचत ठेवी [रु] | टक्के एकूण ठेवींशी | प्रॉव्हीडंडफंड रिकरिंग ठेव [रु] | टक्के एकूण ठेवींशी | रयत बचत ठेव [क्युमिलेटीव्ह ठेव] [रु] | टक्के एकूण ठेवींशी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. |
| १९६८-६९ | २९, ७४२ | ३.५८ | – | | २,०२,७०८ | २४.४० | ५,९८,४०० | ७२.०२ | | |
| १९६९-७० | ३७, २५० | ३.३० | | | २,९६,२१९ | २६.२७ | ७,९४,२१४ | ७०.४३ | | |
| १९७०-७१ | ५२, १५१ | ३.७१ | | | ३,४९,३४१ | २४.८५ | १०,०४,१३० | ७१.४४ | | |
| १९७१-७२ | १,५४,८५१ | ८.६२ | | | ४,०७,६४९ | २२.७० | १२,३३,४३३ | ६८.६८ | | |
| १९७२-७३ | ७४, ८५१ | ३.५५ | | | ५,५२,६९० | २६.२७ | १४,७५,९६८ | ७०.१७ | | |
| १९७३-७४ | ९८,४५४ | ३.८४ | | | ६,१३,६९३ | २३.९७ | १८,४८,५४० | ७२.१९ | | |
| १९७४-७५ | १,५१,२७५ | ५.१८ | | | ६,१०,१०१ | २०.७५ | २१,७७,८२५ | ७४.०७ | | |
| १९७५-७६ | २,२२,२८० | ६.४४ | | | ५,८१,७४४ | १६.७० | २६,७६,४२१ | ७६.८६ | | |
| १९७६-७७ | २,६९,७८७ | ५.४० | – | – | ५,८७,९६२ | ११.७८ | ३५,४६,८६५ | ७१.०४ | ५,८७,९६२ | ११.७८ |
| १९७७-७८ | २,७९,३९० | ५.३९ | ३,३११ | ०.०६ | ५,०७,२५२ | ९.८२ | ४३,६२,९५७ | ८९.१३ | ३२,९८८ | ०.०६ |
| १९७८-७९ | ३,६८,६५३ | ५.२७ | २१० | ०.०१ | ८,३५,८५३ | ११.९६ | ५७,१४,१५५ | ८१.७५ | ७०,९५० | १.०१ |
| १९७९-८० | ४,७६,४३१ | ५.११ | ४४२ | ०.०३ | ८,०५,९१६ | ८.६५ | ७८,८३,७१५ | ८४.६८ | १,४३,०९१ | १.५३ |
| १९८०-८१ | ७,०६,११२ | ५.५८ | १,२४९ | ०.१२ | ९,३६,४८३ | ७.४१ | १,०७,३८,४७७ | ८४.९५ | २,४४,५४२ | १.९३ |
| १९८१-८२ | ८,०६,०८० | ६.०० | १,०५१ | ०.०५ | १२,५०,०१० | ९.३१ | १,०६,४०,३७४ | ७९.२८ | ५,०८,१२६ | ३.७८ |
| १९८२-८३ | १२,४८,०२५ | ५.९८ | ४,०१० | ०.१५ | ११,६७,६५० | ५.५९ | १,६८,६०,८८२ | ८०.७२ | ९,७४,२५६ | ४.६६ |
| १९८३-८४ | ६८,५०,३७८ | २०.८० | ४,६६,९३८ | १.४२ | १३,९५,१४९ | ४.२५ | २,००,७६,२१७ | ६१.१७ | १७,७५,४९२ | ४.४२ |
| १९८४-८५ | ६९,००,३०८ | १९.९८ | ४,११,१५५ | १.१९ | २४,२२,८१२ | ७.०४ | १,७२,८५,२०० | ५०.०४ | २९,६४,३३१ | ८.५८ |
| १९८५-८६ | ८५,०४,५११ | २४.६४ | ८,२१,७४७ | २.३८ | ३०,६१,५७१ | १८.८७ | १,०५,६३,२०१ | ३०.६० | ४६,८३,१३० | १३.५७ |
| १९८६-८७ | १,०३,२५,१५६ | २४.१२ | ८,८६,५९० | २.०७ | ५५,९६,२८६ | १३.०७ | १,०९,७५,२१३ | २५.६३ | ५७,०३,८८६ | १३.३२ |
| १९८७-८८ | १,०२,११,१०५ | २१.७२ | ५,८५,९२५ | १.२४ | ५८,७३,८६५ | १२.५२ | १,१२,९६,०४३ | २४.०३ | ७५,०२,४६१ | १५.९६ |
| १९८८-८९ | १,४५,३०,९९९ | २५.५३ | ८,६२,६५८ | १.५१ | ६६,२९,३८६ | ११.६५ | १,२४,४७,३५१ | २१.८७ | ८९,७९,२२६ | १५.७८ |
| १९८९-९० | १,८४,३५,९१० | २२.९१ | २८,१४,४६६ | ३.४९ | ८३,४३,५५८ | १०.४० | १,५६,४०,१६३ | १९.४५ | १,०३,१६,१३६ | १२.८२ |
| १९९०-९१ | २,१५,११,०२९ | २०.५२ | ११,०७,९९७ | १.०६ | ७०,५१,१११ | ६.७३ | २,००,५३,४४१ | १९.१३ | १,०९,६२,९६१ | १०.४६ |
| १९९१-९२ | २,८६,७०,५२५ | २१.८६ | १५,७३,२७९ | १.२५ | ६४,४१,६२५ | ४.९१ | २,३४,८१,५८० | १७.९० | ९६,४१,६९६ | ७.२५ |

तक्ता : ३ – ७

| वर्ष | वक्तशीर व्याज मुदत ठेव [रू] | टक्के ए.ठे. | शुभमंगल ठेव [रू] | टक्के ए.ठे. | पेन्शन ठेव [रू] | टक्के ए.ठे. | कर्मवीर कॅश सर्टिफिकेट्स | टक्के ए.ठे. | सभासद कायम ठेव | टक्के ए.ठे. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १२. | १३. | १४. | १५. | १६. | १७. | १८. | १९. | २०. | २१. | २२. |
| १९६८-६९ | – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| १९६९-७० | – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| १९७०-७१ | – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| १९७१-७२ | – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| १९७२-७३ | – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| १९७३-७४ | – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| १९७४-७५ | – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| १९७५-७६ | – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| १९७६-७७ | – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| १९७७-७८ | – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| १९७८-७९ | – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| १७९-८० | – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| १९८०-८१ | १४, ४०० | ०. ११ | – | – | – | – | – | – | – | – |
| १९८१-८२ | १, ४१, ८२८ | १. ०५ | ४८, ३४५ | ०. ३५ | २५, ०६० | ०. १८ | – | – | – | – |
| १९८२-८३ | ४, ०९, ९२० | १. ९४ | १, ४४, २२५ | ०. ६ | ७७, ०७५ | ०. ३६ | – | – | – | – |
| १९८३-८४ | १५, ३५, ९११ | ५. ३० | ३, ३१, ६८५ | १. ०१ | १, ८४, ४४५ | ०. ५६ | | | | |
| १९८४-८५ | ३५, ३०, ५१० | १०. २२ | ६, ३८, ११० | १. ८४ | ३, ८५, १४० | १. ११ | – | – | – | – |
| १९८५-८६ | ५२, ०८, ३८० | १५. ०९ | १०, २९, ३१५ | २. ९८ | ६, ४६, ७७५ | १. ८७ | – | – | – | – |
| १९८६-८७ | ६९, ६४, ३७८ | १६. २७ | १४, १४, ५२० | ३. ३० | ९, ४८, ६६५ | २. २२ | – | – | – | – |
| १९८७-८८ | ८३, ७२, ००८ | १७. ८१ | १८, ९०, ०६० | ४. ०२ | १२, ६९, १०५ | २. ७० | – | – | – | – |
| १९८८-८९ | ९३, ९५, ००७ | १६. ५० | २४, १२, ८२५ | ४. २५ | १६, ६०, ९१० | २. ९१ | – | – | – | – |
| १९८९-९० | ९९, ५८, ६३२ | १२. ३८ | ३०, १७, ७४५ | ३. ७५ | २०, ७६, ५१० | २. ५८ | १४, ७८, २७० | १. ८३ | ८३, ५३, ९७३ | १०. ३८ |
| १९९०-९१ | १, ११, ०८, ८६० | १०. ५८ | ३६, ०९, ६८५ | ३. ४४ | २४, ८४, ३६५ | २. ३७ | ४३, ३४, ७८३ | ४. १६ | २, २५, ९१, ९५४ | २१. ५५ |
| १९९१-९२ | १, ४०, ७५, ६९५ | १०. ७५ | ३५, ६७, ५६५ | २. ७२ | २३, ०३, १३५ | १. ७५ | ४८, ९०, १८१ | ३. ७२ | ३, ६३, २०, ९६५ | २७. ६९ |

संदर्भ : तत्रैत्व

सन १९६८-६९ ते १९९१-९२ या काळात बँकेकडे कोणाकोणात्या प्रकारच्या ठेवी किती होत्या हे तक्ता ३.७ मध्ये दर्शविले आहे.

तक्ता ३.७ मध्ये सन १९६८-६९ ते १९९१-९२ या काळातील रयत सेवक सहकारी बँकेतील ठेवींची संरचना दिलेली आहे. रयत सेवक सहकारी बँकेने आपल्या ठेवीदारांसाठी विविध प्रकारच्या ठेव योजना सुरू केलेल्या आहेत, त्या म्हणजे मुदत ठेवी, चालू ठेवी, बचत ठेवी, प्रॉव्हिडंड फंड रिकरिंग ठेव, रयत बचत ठेव, चक्रवाढ व्याज मुदत ठेव, शुभमंगल ठेव, पेन्शन ठेव, कर्मवीर कॅश सर्टिफिकेट्स, सभासद कायम ठेव या होत. या सर्व ठेव योजनांमध्ये १९६८-६९ ते १९९१-९२ या काळात किती ठेवी जमा झाल्या ते आणि त्यांची एकूण ठेवींशी टक्केवारी या तक्त्यामध्ये दिलेली आहे.

१) <u>मुदत ठेवी</u> :

सन १९६८-६९ मध्ये रयत सेवक सहकारी बँकेच्या मुदत ठेवी २९,७४९ रुपये होत्या. त्या १९७९-८० साली ४,७६,४३१ रुपये झाल्या. ही वाढ १६ पटींची आहे. १९८६-८७ मध्ये बँकेतील मुदती ठेवींनी कोटीच्या घरात प्रवेश केला. या वर्षी १,०३,२५,१५६ रुपये ठेवी होत्या. १९९१-९२ या साली या प्रकारातील ठेवीची रक्कम २,८६,७०,५२५ रुपये झाली. १९६८-६९ च्या ठेवींशी तुलना करता ही वाढ ९६३ पटींनी झालेली दिसते. १९८७-८८ या वर्षाचा अपवाद वगळता या प्रकारच्या ठेवींमध्ये सतत वाढ होत गेल्याचे दिसून येते.

मुदत ठेवींची एकूण ठेवींशी टक्केवारी १९६८-६९ मध्ये ३.५८ होती, ती १९७८-७९ साली ५.२७ झाली. १९८२-८३ पर्यंत एकूण ठेवींशी असणारी

मुदत ठेवींची टक्केवारी एक अंकीच होती. परंतु १९८३-८४ पासून ती द्विअंकी झाली. १९८३-८४ ते १९८८-८९ या काळात एकूण ठेवींशी असणारी २० ते २५ च्या दरम्यान राहिली. बँकेची भक्कम आर्थिक स्थिती आणि ठेवीदारांचा बँकेवर असणारा विश्वास यामधून प्रतीत होतो. मुदती ठेवींमुळे बँकेला दीर्घ मुदतीची कर्जे देऊन त्यामधून नफा वाढविणे शक्य झाले आहे.

२) चालू ठेवी -

रयत सेवक सहकारी बँकेतील चालू ठेवींचा विचार करता तक्त्यावरून आपणास असे दिसून येते की, बँकेने या प्रकारची ठेव योजना सन १९७७-७८ पासून सुरु केलेली आहे. १९७७-७८ या वर्षी बँकेकडील चालू खात्यातील एकूण रक्कम ३,३११/- रुपये असल्याचे दिसून येते. १९८३-८४ मध्ये या ठेवींनी लाखाच्या घरात प्रवेश केला. १९८६-८७ साली, म्हणजे १० वर्षात, बँकेकडील चालू ठेवी ८,८६,५९० रुपये झाल्या. १९७७-७८ शी तुलना करता ही वाढ २६७ पटींची आहे. १९९१-९२ साली बँकेच्या चालू ठेवी १७,७३,२७९ रुपये असल्याचे दिसून येते. १९७७-७८ शी तुलना करता ही वाढ ५३५ पटींची आहे. १९७९-८० पासून १९८१-८२ आणि १९८४-८५ चा अपवाद वगळता १९८९-९० पर्यंत चालू ठेवींमध्ये सतत वाढ होत गेली. १९९०-९१ ला हे प्रमाण कमी झाल्याचे व पुन्हा १९९१-९२ ला वाढल्याचे दिसून येते. मुदत ठेवीशी तुलना करता या ठेवींचे प्रमाण फारच कमी वाटते. कारण या ठेवींवर बँक द.सा.द.शे. फक्त ०.५० टक्के व्याज देत आहे.

बँकेच्या चालू ठेवींची एकूण ठेवींशी असणारी टक्केवारी पाहता असे दिसून येते की, १९७७-७८ मध्ये या ठेवींचे प्रमाण ०.०६ टक्के एवढे अत्यल्प होते. १९८२-८३ ला ते वाढून ०.१५ टक्के झाले. हे प्रमाण १९८९-९० ला सर्वाधिक, म्हणजे ३.४९ टक्के, होते. या ठेवींची एकूण ठेवींशी असणारी

टक्केवारी सतत कमी जास्त होत गेलेली दिसून येते. १९९१-९२ ला ही टक्केवारी १.३५ होती. एकूण ठेवींमध्ये या ठेवींचे प्रमाण कमी असण्याचे कारण म्हणजे या ठेवींवर मिळणारा कमी व्याज दर होय. अर्थात बँकेला या ठेवीतील रक्कम दीर्घकालीन कर्ज पुरवठा करण्यासाठी वापरता येत नसल्याने बँक या प्रकारच्या ठेवींवर जास्त व्याजदर देत नाही.

३) बचत ठेवी -

तक्ता ३.७ वरून असे दिसून येते की, चालू ठेवींपेक्षा बचत ठेवींचे प्रमाण जास्त आहे. १९६८-६९ साली रयत सेवक सहकारी बँकेकडील बचत ठेवी २,०२,७०८ रुपये होत्या, १९७८-७९ साली त्या ५,०७,२५२ रुपये झाल्या म्हणजे या दशकात १९६८-६९ शी तुलना करता १९७८-७९ च्या ठेवी या अडीच पटींनी वाढल्या होत्या. तर अध्ययन कालातील शेवटचे वर्ष म्हणजे १९९१-९२ साली, या ठेवी ६४,४१,६६५ रुपये झाल्या. ही वाढ १९६८-६९ शी तुलना करता ३१ पटींपेक्षा जास्त होती.

रयत सेवक सहकारी बँकेतील बचत ठेवी पाहता असे दिसून येते की, १९७४-७५, १९७७-७८, १९७९-८०, १९८२-८३, १९९०-९१ आणि १९९१-९२ सालचा अपवाद वगळता ठेवी सतत वाढत गेल्याचेच दिसते. रयत शिक्षण संस्थेतील कर्मचारी व रयत शिक्षण संस्थेच्या ठेवी यात असतात.

बँकेतील बचत ठेवींची एकूण ठेवींशी टक्केवारी पाहता आपणास असे दिसून येते की, १९६८-६९ साली या ठेवी २४.४० टक्के होत्या. एकूण अध्ययन कालखंडाचा अभ्यास केल्यास, १९६८-६९ ते १९९१-९२ या काळात बचत ठेवींची एकूण ठेवींशी असणारी टक्केवारी ४ ते २६ च्या दरम्यान सतत कमी जास्त होत राहिली आहे.

४) प्रॉव्हिडंड फंड रिकरिंग ठेव :

१९६८-६९ साली या प्रकारच्या ठेवीत ५,९८,४०० रुपये होते. १९७८-७९ साली या ठेवी ५७,१४,१५५ रुपये होत्या. ही वाढ साडे नऊ पटींची आहे. १९९१-९२ साली बँकेच्या या ठेवी २,३४,८१,५८० रुपये होत्या. ही वाढ बँकेच्या १९६८-६९ सालच्या ठेवींशी तुलना करता ३९ पटींची आहे.

तक्ता ३.७ पाहिल्यास असे दिसून येते की, बँकेच्या ज्या एकूण १० प्रकारच्या ठेवी आहेत त्यात सर्वात जास्त एकूण ठेवींशी टक्केवारी असणारी प्रॉव्हिडंड फंड रिकरिंग ठेव ही योजना आहे. १९६८-६९ साली या ठेवींची एकू एकूण ठेवींशी असणारी टक्केवारी ७२.०२ होती, १,९७९.८० साली ती ८४.६८ होती तर अध्ययनकालाच्या शेवटच्या वर्षी मात्र ती १७.९० टक्क्या-पर्यंत घसरली. १९६८-६९ ते १९९१-९२ या काळात या ठेवींची एकूण ठेवींशी असणारी टक्केवारी १७.८४ च्या दरम्यान कमीअधिक होत राहिलेली आहे.

५) रयत संचित बचत ठेव :

ही ठेव योजना रयत सेवक सहकारी बँकेने १९७६-७७ पासूनसुरु केली आहे. या योजनेत पहिल्याच वर्षी ५,८७,९६२ रुपयांच्या ठेवी मिळाल्या १९९०-९१ साली या ठेवी सर्वात जास्त, म्हणजे १,०९,६२,९६१ रुपये होत्या. म्हणजे १९७६-७७ च्या ठेवींशी तुलना करता ही वाढ साडे सतरा पटींची आहे. परंतु १९९१-९२ साली या ठेवीतील रक्कम कमी झालेली (९६,४१,६९६ रुपये) होती. एकूण अध्ययनकालात या ठेवी ३२,००० ते १,००,००० रुपये या दरम्यान राहिल्या. ठेवींच्या तारणावर कर्ज देण्याची व्यवस्था या योजनेत असल्याने, विमा हप्त्याची सोय असल्याने आणि ठेवीं-च्या रकमा पगार कपातीतून पाठविण्याची व्यवस्था असल्याने हा ठेव प्रकार "रयत शिक्षण संस्थेतील" कर्मचा-यात प्रिय झालेली आहे.

या प्रकारच्या ठेवींची एकूण ठेवींशी असणारी टक्केवारी पाहिल्यास असे दिसून येते की, १९७६-७७ साली ती ११.७८ टक्के होती. परंतु त्यानंतर मात्र १९८४-८५ पर्यंतही टक्केवारी १९७६-७७ च्या टक्केवारी-पेक्षा कमी राहिली. अध्ययनकाळातील सर्वात जास्त टक्केवारी असणारे वर्ष १९८७-८८ हे आहे. या वर्षी या ठेवींची एकूण ठेवींशी असणारी टक्केवारी १५९६ होती. तर अध्ययनकाळातील शेवटचे वर्ष, म्हणजे १९९१-९२ साली, ही टक्केवारी ७.३५ पर्यंत घसरली.

६) चक्रवाढ व्याज मुदत ठेव :

बँकेने ही योजना १९८०-८१ पासून सुरु केली आहे. मुदलावर व्याज आणि व्याजावर व्याज मिळवून देणारी ही योजना आहे. १९८०-८१ साली या प्रकारच्या ठेवी १४,४०० रुपयांच्या होत्या. तर अध्ययन काळाच्या शेव-टच्या वर्षी, म्हणजे १९९१-९२ साली, त्या १,४०,७७,६९५ रुपयांच्या होत्या. म्हणजे ही वाढ ९७७ पटींची आहे. एवढया अल्पावधीत म्हणजे ११ वर्षात एवढया मोठया प्रमाणावर ठेवी जमा करणारी ही एकमेव ठेव योजना आहे. या योजनेची काही खास वैशिष्टये आहेत. ती म्हणजे, तीन वर्षे वीस दिवसात रक्कम दाम दुप्पट आणि आठ वर्षे तीन महिने नऊ दिवसात दाम तिप्पट होते. यामुळे ही ठेव योजना लोकप्रिय होऊन ठेवींमध्ये वाढ होत आहे.

ठेवींची एकूण ठेवींशी असणारी टक्केवारी पाहिल्यास, १९८०-८१ साली ती ०.११ टक्के होती. १९८५-८६ पर्यंत ही टक्केवारी सतत वाढत गेल्याचे आढळते. परंतु त्यानंतर मात्र तिच्यात चढउतार होत गेल्याचे दिसते. अध्ययन काळाच्या शेवटच्या वर्षी ही टक्के वारी १०.७५ होती.

ही ठेव योजना आकर्षक आणि लाभदायक असल्याने या ठेवीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत आहे. या ठेवींतील रक्कम बँकेला दीर्घकालीन कर्जा-मध्ये गुंतविता येत असल्याने नफाही जास्त मिळतो.

७) शुभमंगल ठेव योजना :

ही ठेव योजना बँकेने १९८१-८२ पासून सुरू केली आहे. १९८०-८२ साली या ठेवीत ४८,२४५ रुपये होते, तर १९८५-८६ साली ही रक्कम १०,२९,३१५ रुपये झाली. ही वाढ २१ पटींची आहे. १९९१-९२ साली या ठेवी ३५,६७,५६५ रुपयांच्या होत्या. ही वाढ १९८१-८२ च्या ठेवींशी तुलना करता ७३ पटींची आहे. तक्त्यावरून असे दिसून येते की, १९८१-८२ पासून १९९१-९२ पर्यंत या ठेवीत सतत वाढ होत गेलेली आहे. शुभमंगल ठेव योजनेची एकूण ठेवींशी असणारी टक्केवारी पाहिल्यास, १९८१-८२ पासून १९८८-८९ पर्यंत ही टक्केवारी सतत वाढत गेलेली आहे. त्यानंतर मात्र ती कमी होत गेली. या ठेवीतील रक्कम बँकेला दीर्घकालीन गुंतवणुकीसाठी वापरता येत असल्याने बँकेला व्याज आणि नफा मिळविता येतो.

८) पेन्शन ठेव योजना :

ही योजना बँकेने १९८१-८२ पासून्सु सुरु केलेली आहे. तक्त्यावरून असे दिसून येते की, १९८१-८२ साली या प्रकारच्या ठेवी २५,०६० रुपयांच्या होत्या. १९८७-८८ साली त्या १९,६९,१०५ रुपयांच्या झाल्या. ही वाढ ५० पटींची आहे. १९९१-९२ साली या ठेवी २३,०३,१३५ रुपयांच्या होत्या. १९८१-८२ शी तुलना करता ही वाढ ९१ पटींची आहे. १९९१-९२ चा अपवाद वगळता या ठेवीतील रक्कम सतत वाढत गेलेली आहे.

पेन्शन ठेव योजनेतील ठेवींची एकूण ठेवींशी असणारी टक्केवारी पाहिल्यास, १९८१-८२ साली ही टक्केवारी ०.१८ होती. १९८८-८९ ला ती

२.९१ झाली. तर १९९१-९२ ला ती १.७५ घसरली. १९८०-८१ ते १९८८-८९ या काळात या ठेवींची एकूण ठेवींशी असणारी टक्केवारी सतत वाढत गेल्याचे दिसते. परंतु त्यानंतर मात्र ती कमी झाली.

या ठेवींतील रक्कम ठेवीदारास, दरमहा गुंतविलेल्या रकमेच्या दुप्पट १२१ महिन्यांनंतर मिळते. ही रक्कम त्याला किंवा त्याच्या वारसाला तह-हयात मिळत असल्याने या ठेवींचा लाभ ठेवीदार घेत असल्याचे दिसते. तसेच या ठेवीतील रक्कम बँकेला दीर्घकालीन गुंतविता येत असल्याने फायदेशीर ठरते.

९) कर्मवीर कॅश सर्टिफिकेटस् :

ही योजना बँकेने १९८९-९० सालापासून सुरु केली आहे. या योजने-नुसार यामध्ये १०च्या पटीत रक्कम विशिष्ट काळासाठी गुंतवावी लागते. १९८९-९० साली यातील ठेवी १४,७८,२७० रुपयांच्या होत्या. अगदी पहिल्याच वर्षी एवढया मोठया प्रमाणावर ठेवी गोळा करणारी ही एक ठेव योजना आहे. १९९१-९२ साली या योजनेतील ठेवी या ४८,९०,१८१ रुपये होत्या. म्हणजे ही वाढ तिपटीपेक्षा जास्त आहे. या ठेवींची एकूण ठेवींशी असणारी टक्केवारी पाहिल्यास, १९८९-९० साली ही टक्केवारी १.८३ होती ती १९९१-९२ ला ३.७२ पर्यंत वर गेली. या ठेवींतील रक्कम झपाटयाने वाढत आहे. त्यावरुन ही योजना लोकप्रिय असल्याचे दिसून येते. शिवाय बँकेला यातील रक्कम दीर्घकालीन गुंतवणुकीसाठी वापरता येत असल्याने लाभदायक ठरते.

१०) सभासद कायम ठेव योजना :

ही योजनासुध्दा बँकेने १९८९-९० सालापासूनच सुरु केली. १९८९-९० साली या ठेवी ८३,५३,९७३ रुपयांच्या होत्या. अगदी पहिल्याच वर्षी

वर्षी एवढया मोठया प्रमाणावर ठेवी गोळा करणारी ही एकमेव योजना आहे. १९९१-९२ साली या ठेवी ३,६३,२०,९६५ रुपये होत्या. म्हणजे वाढ साडेचार पटींची आहे. या ठेवींची एकूण ठेवींशी असणारी टक्केवारी १०.३८ होती. ती १९९१-९२ साली २७.६९ पर्यंत वाढली. या ठेवीतील रक्कम एवढया मोठया प्रमाणावर वाढण्याचे कारण असे की, ही ठेव योजना सर्व सभासदांना सक्तीची केलेली आहे. आणि ठेवीच्या रकमा पगारा कपातीतून पाठविल्या जातात. या ठेवीतील रक्कमही बँकेला दीर्घकालीन गुंतवणुकीसाठी वापरता येत असल्याने लाभदायक ठरते.

सारांश;

रयत सेवक सहकारी बँकेच्या ठेवींच्या रचनेत वैशिष्ठयपूर्ण बदल झालेले आहेत. बँकेने विविध प्रकारच्या ठेव योजना चालू केल्या आहेत. काही ठेवी सभासदांना सक्तीच्या केल्या आहेत. तर काही ठेवी तिच्या वैशिष्टयांमुळे सभासदांना आकर्षक होत आहेत. १९६८-६९ ते १९९१-९२ या २४ वर्षांच्या काळात प्रत्येक ठेवीच्या प्रमाणात चढउतार झाल्याचे दिसून येते. दीर्घकालीन गुंतवणुकीसाठी बँकेला वापरता येतात
दिसून येते. दीर्घकालीन ठेवी या बँकेला लाभदायक ठरल्या आहेत, कारण त्या दीर्घकालीन गुंतवणुकीसाठी बँकेला वापरता येतात. ठेवीदारांनाही या योजना लाभदायक ठरत आहेत. शिवाय सर्व ठेवींना विमा संरक्षण आहे.

३.३.५ <u>बँकेने घेतलेली कर्जे</u> :

बँकेने गोळा केलेल्या ठेवी आणि बँकेची गुंतवणूक रचना यावरुन कोणत्याही बँकेची रोखता दिसून येते. कित्येकदा आपले आर्थिक व्यवहार पूर्ण करण्यासाठी बँक अन्य वित्तीय संस्थांकडून कर्ज घेते. या संस्था म्हणजे व्यापारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, राज्य सहकारी बँक या होत.

घेतली जाणारी कर्जे अल्प मुदतीची तसेच मागणीदेय असतात. रयत सेवक सहकारी बँकेने वेळोवेळी घेतलेल्या अशा कर्जांचा तपशील तक्ता ३.९ मध्ये दिला आहे.

तक्ता ३.८

रयत सेवक सहकारी बँकेने अन्य वित्तीय संस्थांकडून घेतलेली कर्जे

| वर्ष | कर्जे |
| --- | --- |
| १९६८-६९ | — |
| १९६९-७० | — |
| १९७०-७१ | — |
| १९७१-७२ | — |
| १९७२-७३ | — |
| १९७३-७४ | — |
| १९७४-७५ | — |
| १९७५-७६ | — |
| १९७६-७७ | — |
| १९७७-७८ | — |
| १९७८-७९ | — |
| १९७९-८० | — |
| १९८०-८१ | २०,००,००० |
| १९८१-८२ | ३०,००,००० |
| १९८२-८३ | ५०,००,००० |
| १९८३-८४ | २,००,००० |
| १९८४-८५ | १,००० |
| १९८५-८६ | १,४०,००,००० |
| १९८६-८७ | १,०३,००,००० |
| १९८७-८८ | ५७,००,००० |
| १९८८-८९ | ४,०२,००,००० |
| १९८९-९० | ५,०६,००,००० |
| १९९०-९१ | ४,४९,७५,००० |
| १९९१-९२ | १,९८,००,००० |

संदर्भ – तत्रैव

रयत सेवक सहकारी बँकेने अध्ययन काळातील २४ वर्षांच्या काळात शेवटच्या १२ वर्षात अल्पकालीन कर्जाचा आधार घेतलेला दिसून येतो. बँकेने १९६८–६९ ते १९७९–८० या बारा वर्षांच्या काळात आपल्या ~~कर्जाचा आधार~~ व्यवसायासाठी अन्य वित्तीय संस्थांकडून काहिही कर्जे घेतलेली नाहीत. कर्जाचा आधार प्रथम १९८०–८१ साली घेतला. बँकेने १९८०–८१ साली २० लाख रुपयांचे कर्ज घेतले होते, तर १९८१–८२ आणि १९८२–८३ या वर्षी अनुक्रमे ३० लाख आणि ४० लाख रुपयांचे कर्ज घेतले होते. सुरुवातीच्या तीन वर्षांची कर्जाची आकडेवारी मोठी आहे. परंतु १९८३–८४ साली बँकेने फक्त २ लाख रुपयांचे कर्ज घेतलेले दिसून येते आणि विशेष जाणवण्यासारखी बाब म्हणजे या १२ वर्षांच्या काळात पाचव्या वर्षी म्हणजे १९८४–८५ साली बँकेने अगदीच कमी कर्ज घेतले होते, ते फक्त १,००० रुपये होते. १९८५–८६ साली मात्र बँकेने घेतलेल्या कर्जाचा आकडा कोटीच्या घरात गेलेला दिसून येतो. त्यानंतर १९९१–९२ पर्यंत घेतलेल्या कर्जाचे आकडे १९८७–८८ सालचा अपवाद वगळता कोटीच्या घरात असलेलेच दिसून येतात. बँकेने १९८१–८२ ते १९९१–९२ या १२ वर्षांच्या काळात जी कर्जे घेतली त्यामध्ये सर्वाधिक कर्ज १९८९–९० साली घेतले होते, हे कर्ज ५०६ कोटी रुपयांचे होते. त्यानंतरच्या वर्षी म्हणजे १९९०–९१ ला बँकेने कमी कर्ज घेतलेले दिसते. हे कर्ज ४,४९,७५,००० रुपयांचे होते आणि अध्ययन काळाच्या शेवटच्या वर्षी, म्हणजे १९९१–९२ साली, ते त्या अगोदरच्या वर्षापेक्षा कमी होते. ते १.९७ कोटी रुपयांचे होते. अर्थात कर्जाची रक्कम कमी होत जाणे हे बँकेच्या प्रगतीचे लक्षण आहे.

रयत सेवक सहकारी बँकेने १९८०–८१ ते १९९१–९२ या १२ वर्षांच्या काळात मोठ्या प्रमाणात कर्जे घेतली असली तरी बँकेकडील एकंदर ठेवींचा विचार केल्यास ते अत्यल्प आहे हे स्पष्ट आहे. एकंदरित, बँकेने आपल्या व्यवहाराकरिता उभारलेल्या पैशात कर्जरुपाने घेतलेल्या पैशाकडे महत्त्वाचे साधन म्हणून

पाहिले नाही. भागभांडवल आणि ठेवी याच मार्गाकडे बँकेने संपूर्ण लक्ष केंद्रित केलेले आहे. ही समाधानाची बाब आहे. बँकेने ही कर्जे फक्त "सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि, सातारा" या बँकेकडूनच घेतलेली आहेत.

३.३.६ शाखा विस्तार :

बँकेचे स्थैर्य आणि आर्थिक परिस्थिती ही बँकेने गोळा केलेल्या ठेवींवर अवलंबून असते. जास्तीत जास्त ठेवीदार निर्माण करून, आकर्षक ठेव योजनांद्वारे ठेवीदारांना बँकेकडे आकर्षित करावे लागते. गरज असेल त्या ठिकाणी शाखा सुरू करावी लागते. शाखा विस्तार केल्याने ठेवी मिळतातच, पण संबंधित ठिकाणी बँकिंगच्या सुविधा लोकांसाठी उपलब्ध करून देता येतात. "रयत सेवक सहकारी बँक" ही "रयत शिक्षण संस्थेतील" कर्मचाऱ्यांची बँक आहे. महाराष्ट्रातील ही सर्वात मोठी शिक्षण संस्था असून दक्षिण महाराष्ट्रात ती विस्तारलेली आहे. बँकेने मुख्य कार्यालय सातारा येथे आहे, परंतु दूरवरच्या सभासदांना हे गैरसोयीचे ठिकाण होते. त्यामुळे बँकेने सभासदांच्या सोईच्या दृष्टिने १९८३-८४ मध्ये अहमदनगर, पुणे आणि सांगली या ठिकाणी रिझर्व्ह बँकेच्या मान्यतेने शाखा उघडल्या आहेत. बँकेने या तीन शाखांतून आपला विस्तार केलेला आहे.

रयत सेवक सहकारी बँकेच्या तीन शाखांची १९९१-९२ मध्ये असणारी ठेवी, कर्जे, नफा, तोटा याबाबतची सर्वसाधारण परिस्थिती तक्ता ३.९ मधून समजते.

## तक्ता ३.१

### रयत सेवक सहकारी बँकेच्या शाखांचा तपशील

| शाखा | | १९९१-९२ (रुपये) | एकूणांशी प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|
| १) सांगली | | | |
| अ) | ठेवी | १,६४,४१,६३७ | ३३.१६ |
| आ) | कर्जे | २,७७,४२,०९७ | २३.८६ |
| इ) | नफा | १०,७३,८६२.४० | २४.४० |
| ई) | तोटा | — | |
| २) अहमदनगर | | | |
| अ) | ठेवी | १,६६,३७,३८५ | ३३.५४ |
| आ) | कर्जे | ५,०६,४०,३२७. | ४३.५७ |
| इ) | नफा | १७,३१,४११.६३ | ३१.३४ |
| ई) | तोटा | -- | |
| ३) पुणे | | | |
| अ) | ठेवी | १,६५,१७,८४१ | ३३.३० |
| आ) | कर्जे | ३,७८,५५.२०१ | ३२.५७ |
| इ) | नफा | १५,९५,८२४.८३ | ३६.२६ |
| ई) | तोटा | -- | |

संदर्भ - ५२ वा वार्षिक अहवाल, १९९१-९२, पृ. ३७

सन १९९१-९२ साली सांगली, अहमदनगर व पुणे या शाखांच्या ठेवींचा विचार करता तीनही शाखांनी जवळपास सारख्याच प्रमाणात ठेवी गोळा केलेल्या आहेत. सांगली शाखेची एकूण शाखांच्या ठेवीतील

टक्केवारी ३३.१६ अहमदनगर शाखेची ३३.५४ तर पुणे शाखेची ३३.३० आहे.

१९९१-९२ सालचा शाखांचा कर्जाचा विचार करता ~~कर्जे दिली~~ सांगली बँकेने २,७७,४२,०९७ रुपयांची कर्जे दिली. अहमदनगर शाखेने आणि पुणे शाखेने अनुक्रमे ५,०६,४०,३२७ रुपये आणि ३,७८,५५,२०१ रुपये एवढी कर्जे दिली. कर्जे देण्यामध्ये अहमदनगर शाखेचा पहिल्या क्रमांक लागतो. सांगली शाखेची एकूण शाखांतील कर्जाची टक्केवारी २३.८६, अहमदनगर शाखेची ४३.५७, तर पुणे शाखेची ३२.५७ होती. या तीनही शाखांनी मोठया प्रमाणात कर्जे दिली.

१९९१-९२ सालचा शाखांचा नफ्याचा विचार करता, सांगली शाखेला रु. १०,७३,८६२.४०, अहमदनगर शाखेला रु. १७,३१,४१९.६३ तर पुणे शाखेला रु. १५,९५,८२४.८३ नफा झाला. नफा मिळविण्यामध्येही अहमदनगर शाखेचा पहिला, पुणे शाखेचा दुसरा तर सांगली शाखेचा तिसरा क्रमांक लागतो. सांगली शाखेची एकूण शाखांतील नफ्याची टक्केवारी २४.४०, अहमदनगर शाखेची ३९.३४ तर पुणे शाखेची ३६.२६ होती. १९९१-९२ साली या तीनही शाखांचा एकूण नफा ४४,०१,१०६.८६ होता. शाखांनी मोठया प्रमाणात नफा मिळविलेला असल्याने शाखा कार्यक्षम आहेत असे दिसते.

### ३.३.७ मुख्य कार्यालय आणि शाखा यांची तुलना :

रयत सेवक सहकारी बँकेचे मुख्य कार्यालय हे सातारा या ठिकाणी आहे. १९९१-९२ सालची ठेवी, कर्जे आणि नफा या बाबतची मुख्य कार्यालय आणि शाखा यांची तुलना तक्ता ३.१० मध्ये केलेली आहे.

## तक्ता ३.१०

### मुख्य कार्यालय आणि शाखा यांची तुलना (१९९१-९२)

| घटक | मुख्य कार्यालय | एकूणांशी टक्केवारी | शाखा | ए एकूणांशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ठेवी | ८,१९,४७,४४७ | ६२.३० | ४,९५,९६,८६३ | ३७.७० |
| ठेवी | ६,८३,८४,०१० | ३७.०४ | ११,६२,३७,३२६ | ६२.९६ |
| ठेवी | ३०,८५,१७९.३० | ४१.२१ | ४४,०१,१०६.८६ | ५८.७९ |

संदर्भ - ५२वा वार्षिक अहवाल, १९९१-९२, पृ. ३७.

१९९१-९२ या वर्षी मुख्य कार्यालयाकडील ठेवी ८,१९,४७,४४७ रुपये होत्या. एकूण ठेवींशी त्यांची टक्केवारी ६२.३० होती. शाखांची टक्केवारी ३७.७० होती.

कर्जाचा विचार करता, या वर्षी मुख्य कार्यालयाने ६,८३,८४,०१० रु रुपयांची कर्जे दिली होती. एकूण कर्जाशी मुख्य कार्यालयाने दिलेल्या कर्जाची टक्केवारी ३७.०४ होती. शाखांची टक्केवारी ६२.९६ होती.

नफ्याचा विचार करता, १९९१-९२ साली मुख्य कार्यालयाला रुपये ३०,८५,१७९.३० नफा झाला. एकूण नफ्याशी त्यांची टक्केवारी ४१.२१ आहे. शाखांची टक्केवारी ५८.७९ होती.

## स मा रो प :

या प्रकरणात रयत सेवक सहकारी बँकेच्या आर्थिक बैठकीचा अभ्यास करण्यात आला. रयत सेवक सहकारी बँक ही रयत शिक्षण संस्थेतील

LIBRARY ... HAPUR

कर्मचाऱ्यांची बँक आहे. १६ ऑगस्ट, १९४० रोजी सहकारी पत संस्था म्हणून स्थापन झालेल्या या संस्थेचे २१ ऑक्टोबर, १९६९ रोजी बँकेत रूपांतर झाले. या प्रकरणातील अध्ययन कालावधी हा सन १९६८-६९ ते १९९१-९२ असा २४ वर्षांचा आहे.

१९६८-६९ साली बँकेचे अधिकृत भांडवल ५ लाख रूपये होते, ते १९९१-९२ मध्ये ५ कोटी रूपयांपर्यंत वाढले. त्याचप्रमाणे वसूल भांडवल हे १९६८-६९ साली ४,१८,४०० रूपये होते, ते १९९१-९२ साली ४,०४,३६,३०० रूपये झाले. ही वाढ ९६ पटींची होती. रयत सेवक सहकारी बँकेची १९६८-६९ ची सभासद संख्या १९९२ होती. ती १९९१-९२ मध्ये १२,५६३ पर्यंत गेली. म्हणजे ही वाढ सव्वा सहा पटींची आहे. बँकेचे खेळते भांडवल १९६८-६९ मधील १३,३४,९७८ वरून १९९१-९२ मध्ये २०,८०,१३,००० रूपये पर्यंत पोचल्याने वाढ १५५ पटींनी झाली.

१९६८-६९ साली बँकेकडील एकूण सर्व प्रकारच्या ठेवी ८,३०,८५७ रूपये होत्या. आपल्या अनेक आकर्षक ठेव योजनांद्वारे बँकेने १९९१-९२ पर्यंत १३,११,६८,२८६ रूपयांच्या ठेवी गोळा केल्या. ही वाढ १५७ पटींची आहे.

बँकेने अध्ययन काळाच्या २४ वर्षात फक्त शेवटच्या १२ वर्षात अन्य संस्थाकडून कर्जे घेतलेली आहेत. यामधून बँकेची आर्थिक कार्यक्षमता दिसून येते. १९८३-८४ साली बँकेने तीन शाखा उघडून आपल्या कार्याचा विस्तार वाढविलेला आहे. या तीनही शाखा चांगल्या अवस्थेत असून ठेवी संकलन, कर्ज वितरण यामध्ये शाखांनी मोलाची कामगिरी बजाविलेली आहे. थोडक्यात, रयत सेवक सहकारी बँकेची आर्थिक बैठक भक्कम आहे.

.....